रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २६२
www.ramprahar.com
बुधवार, १० एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## मनसेचा महायुतीला पाठिंबा; राज ठाकरेंची घोषणा



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी (दि.९) पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महायुतीला पाठिंबा जाहीर केला. मुंबईतील गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरे काय भूमिका घेणार याकडे महाराष्ट्रासह देशाचे लक्ष लागले होते. त्यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कणखर नेतृत्वासाठी मी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी यांना बिनशर्त पाठिंबा देत आहे, असे राज ठाकरे यांनी या वेळी सांगितले. ते म्हणाले की, मी कधीही व्यक्तीगत टीका करत नाही. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर व्यक्तीगत टीका करतात. मी तशी केली नाही. मुख्यमंत्रीपद मिळाले नाही म्हणून मी टीका करीत नाही. तुम्हाला सत्तेत हाकलून दिले म्हणून तुम्ही त्यांच्यावर टीका करतात. तुम्हाला काय हवंय हे सांगण्यासाठी आणि मांडण्यासाठी मी आलोय.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# जागावाटपानंतरही ‘मविआ’त धुसफूस

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील शिवालयमध्ये महाविकास आघाडीची मंगळवारी (दि.१०) संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. या वेळी जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर करण्यात आला. त्यानुसार उद्धव ठाकरे यांचा पक्ष सर्वाधिक २१ जागा, काँग्रेस १७, तर शरदचंद्र पवार यांचा पक्ष १० जागा लढवणार आहे. दरम्यान, यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मुंबईतील पत्रकार परिषदेस खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उद्धव ठाकरे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार संजय राऊत यांच्यासह महाविकास आघाडीतील अन्य नेते उपस्थित होते.

काँग्रेसला नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, मुंबई उत्तर-मध्य, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, रामटेक आणि उत्तर मुंबई हे मतदारसंघ मिळाले आहेत.

उद्धव ठाकरेंच्या पक्षाला जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशीव, रत्नागिरी, बुलढाणा, हातकणंगले, संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ-वाशिम, मुंबई उत्तर-पश्चिम, मुंबई दक्षिण-मध्य, मुंबई दक्षिण, मुंबई ईशान्य या जागा मिळाल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वाट्याला बीड, बारामती, शिरूर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर दक्षिण आणि बीड या जागा आल्या आहेत.

### मी स्वतः नाराज, पण हायकमांडच्या आदेशाचे पालन करावे लागते -पटोले




यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सांगली, भिवंडी, दक्षिण मध्य मुंबई या मेरिटच्या आधारे जागा हव्या होत्या. शेवटपर्यंत आम्ही किल्ला लढवला. सांगलीत विश्वजित कदमांनी संघटनेचे काम केले आहे. ही जागा कुठल्याही परिस्थितीत काँग्रेसला मिळेल अशी अपेक्षा होती, पण तोंडचा घास गेल्यासारखी कार्यकर्त्यांची भावना आहे. मी स्वतः नाराज आहे, पण हायकमांडच्या आदेशाचे पालन करावे लागते.

दरम्यान, आपल्या वाट्याला २१ जागा घेत ठाकरे गट महाविकास आघाडीत मोठा भाऊ ठरला आहे. असे असले तरी सांगली, भिवंडी मतदारसंघात काँग्रेसच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीची धग कायम आहे. ही नाराजी दूर करण्याचे आव्हान महाविकास आघाडीसमोर आहे. मोठा भाऊ म्हणून ठाकरे गटासमोरही ते आव्हान आहेच. वेळीच पावले नाही उचलली, तर या दोन मतदारसंघांतील नाराजीचा परिणाम अन्य मतदारसंघांवरही होण्याचा धोका आहे.



### विशाल पाटील समर्थक आक्रमक

महाविकास आघाडीतील जागावाटपात सांगलीची जागा उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे गेल्याने सांगली काँग्रेसमधील कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. विशाल पाटील यांच्याबाबत सोशल मीडियावर जोरदार स्टेट्स व्हायरल झाले आहेत. या पोस्टमध्ये आमचं काय चुकलं? आता लढायचं जनतेच्या कोर्टात असं म्हटले आहे. दरम्यान, उद्या सांगलीतील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. यानंतर आम्ही आमची भूमिका स्पष्ट करणार आहोत, असे पक्षाचे जिल्हाध्यक्ष विक्रम सावंत यांनी म्हटले आहे.

### वर्षा गायकवाड संतापल्या!



महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेनंतर मविआ नेत्यांची बैठक झाली. ही बैठक संपल्यानंतर काँग्रेस नेते काही न बोलताच निघून गेले, तर आघाडीतील जागावाटपावर काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. ज्या जागा आम्ही निवडणून येऊ शकतो त्या जागा आम्हाला मिळालेल्या नाहीत, असे काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे तसेच ज्या जागांवर आमची ताकद नाही अशा जागा देण्यात आल्याचा संतापही गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.



# पनवेलमध्ये नववर्ष शोभायात्रा उत्साहात

### नवभारत घडवण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हा -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुढीपाडवा अर्थात मराठी नवीन वर्षानिमित्त पनवेल शहरात मंगळवारी (दि.९) नववर्ष स्वागत समितीच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेत रामरथ, लेझीम पथक, ढोल पथक, ध्वज पथक, विविध चित्ररथ, झांज पथक तसेच पारंपरिक वेषभूषा करून पनवेलकर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही शोभायात्रेत सहभाग घेत नवीन वर्षामध्ये सर्व मंगल घडत राहो, ज्या ज्या क्षेत्रात काम करीत आहात त्या क्षेत्रात पराक्रम करा तसेच हिंदू राष्ट्र आणि नवभारत घडवण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हा, अशा शुभेच्छा सर्व नागरिकांना दिल्या.



नव्या वर्षाचे स्वागत करण्याकरिता पनवेलमध्ये नववर्ष स्वागत समितीच्या वतीने गुढीपाडव्याच्या दिवशी भव्य शोभायात्रा काढण्यात येते. १९९८पासून ही परंपरा अविरत सुरू असून यंदाचे या शोभायात्रेचे रौप्य महोत्सवी अर्थात २५वे वर्ष होते. शोभायात्रेला पनवेल शहरातील वडाळे तलावापासून सुरुवात झाली. गावदेवी पाडा, दांडेकर हॉस्पिटल, स्वामी हॉटेल, छत्रपती शिवाजी महाराज रोड, आदर्श लॉज, जुने प्रांत कार्यालय, गावदेवी पाडा, धुतपापेश्वर कॉर्नर, महात्मा फुले मार्ग, श्री विरूपाक्ष महादेव मंदिर, जय भारत नाका, अन्नपूर्णा चौक, लोकमान्य टिळक रोड असे मार्गक्रमण करीत स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात शोभायात्रेची सांगता झाली.

या शोभायात्रेत महिला तसेच लहान मुले पारंपरिक वेशभूषा करून सहभागी झाली होती. विविध संस्थांच्या वतीने शोभायात्रेदरम्यान सामाजिक विषयांसदर्भात जनजागृती करण्यात, तर विविध मंडळांच्या वतीने आलेल्या नागरिकांना पाणी, सरबताचे वाटप करण्यात आले. शोभायात्रेत स्त्रीशक्तीसोबत विविधतेतून एकतेचा संदेश देण्यात आला. या वेळी बालकांचा सहभाग सर्वांचे लक्ष वेधून घेत होता, तर युवानाद ढोल पथकाच्या आवाजाने परिसर दुमदुमला. (पान २ वर..)

## निवडक

### केजरीवालांच्या अटकेला आव्हान देणारी याचिका कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली :** मद्य धोरण घोटाळाप्रकरणी अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना हायकोर्टाने झटका दिला आहे. ईडीने केलेली अटक बेकायदेशीर नाही असे सांगत हायकोर्टाने केजरीवाल यांची याचिका फेटाळली आहे. केजरीवाल यांनी ईडीकडून करण्यात आलेली अटक आणि कोठडीला आव्हान देत याचिका दाखल केली होती, मात्र कायद्याच्या दृष्टिकोनातून केलेली कारवाई योग्य असल्याचा निर्वाळा हायकोर्टाने देत केजरीवाल यांना फटकारले आहे.

### काँग्रेसचे प्रवक्ते राजू वाघमारे शिवसेनेत दाखल

**ठाणे :** काँग्रेसचे प्रवक्ते राजू वाघमारे यांनी



मंगळवारी (दि.९) ठाण्यातील आनंद आश्रमात येऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. या वेळी शिंदे यांनी त्यांचे स्वागत करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविकास आघाडीमध्ये कुणाचा पायपोस कुणात नसून काँग्रेसची फरफट सुरू आहे. त्यामुळे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत, असे वाघमारे यांनी सांगितले.

# भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी विरोधकांची आघाडी

### ■ पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल

**बालाघाट : वृत्तसंस्था**

भ्रष्टाचार हटविण्याचा आमचा संकल्प आहे, तर भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी विरोधक आघाडी करून मोर्चे काढत आहेत, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि.९) केला. ते मध्य प्रदेशातील बालाघाट येथे जाहीर सभेत बोलत होते. येत्या ४ जूनला देशातून काँग्रेसचा सफाया झालेला असेल आणि जनतेच्या भरघोस पाठिंब्याने पुन्हा एकदा रालोआ सरकार सत्तेवर विराजमान होईल, असा विश्वासही पंतप्रधान मोदींनी या वेळी व्यक्त केला.



काँग्रेसने देशाचा विकास रोखल्यामुळे विकासाच्या लाभापासून सर्वसामान्य जनता वंचित राहिली. आदिवासी, दलित, मागासवर्गीयांची उपेक्षा करणाऱ्या काँग्रेसमुळे देश समस्यांच्या खाईत लोटला गेला आणि समस्या सोडविण्यासाठी अन्य देशांचे उंबरठे झिजविण्याची वेळ काँग्रेसवर आली. आता विकासाचे वारे देशाच्या कानाकोपऱ्यात वाहात आहेत आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी जगातील देश भारताकडे आशेने पाहात आहेत. सबका साथ सबका विकास या मंत्राची ही शक्ती आहे. पुन्हा एकदा मोदी सरकार हा नारा देशाच्या कानाकोपऱ्यात घुमत असून ही केवळ खासदारांना विजयी करण्याची निवडणूक नाही, तर विकसित भारताच्या संकल्पाला नवी ऊर्जा देणारी निवडणूक आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.


भारतात झालेल्या जी-२० परिषदेत जागतिक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेतले गेले तेव्हा प्रत्येक देशवासीयाला अभिमान वाटला. पूर्वी काँग्रेस सरकारे त्यांच्या समस्या घेऊन इतर देशांत जात असत, पण आता काळ बदलला आहे. आज जगातील मोठे देश समस्या सोडवण्यासाठी भारताशी चर्चा करतात. देशाची अशी स्थिती पाहून प्रत्येक भारतीयाचे मनोबल वाढते, असेही पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

आजपर्यंत कोणत्याही सरकारने आधुनिक पायाभूत सुविधांवर जितका खर्च केला नसेल, एवढा खर्च आमचे सरकार करीत आहे. आधीच्या सरकारांनी ज्यांची उपेक्षा केली, ज्यांना विकासापासून वंचित ठेवले त्या दलित, मागास आणि आदिवासी समाजाला भाजपने सन्मान दिला आहे. सरकार गरीब आणि आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी अहोरात्र काम करीत आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

भाजप सरकार गरिबांच्या हक्काचे पैसे थेट गरिबांच्या खात्यात पाठवत आहे. गरिबांचा पैसा लुटणाऱ्यांवर आता कायद्याचे फास आवळले जात आहेत, पण काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे नेते भ्रष्टाचाऱ्यांवरील कारवाई थांबवण्यासाठी खुलेआम मोर्चे काढत आहेत. भ्रष्टाचार हटवा असे आम्ही म्हणतो, तेव्हा भ्रष्टाचारी वाचवा असा नारा देत ते आंदोलने करतात, अशी टीकाही पंतप्रधान मोदींनी केली. ज्यांच्या तिजोऱ्या भ्रष्टाचाराच्या पैशाने भरल्या आहेत, त्यातील प्रत्येक पैसा वसूल करणार, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

तिसऱ्या कार्यकाळात देशाला मोठे आणि ऐतिहासिक निर्णय घेता यावेत यासाठी भाजपला जनतेच्या आशीर्वादाची गरज आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. तेव्हा उपस्थित जनसमुदायाने उभे राहून त्यांच्या आवाहनास प्रतिसाद दिला.

## गुढी उभारताना शॉक लागून एकाचा मृत्यू



**चौक : प्रतिनिधी**


मराठी नववर्षाची गुढी उभी करताना शॉक लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना खालापूर तालुक्यातील मोरबे धरणग्रस्त पुनर्वसन वसाहत असलेल्या मोरबे गावात मंगळवारी (दि.९) घडली. रवींद्र जगन्नाथ राणे (वय ४२) असे या मयताचे नाव आहे. नवीन वर्षाच्या प्रारंभी घडलेल्या घटनेने ग्रामस्थ सुन्न झाले आहेत.

रवींद्र राणे अंगणात गुढी उभारत असताना घरावरून गेलेल्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीचा त्यांना शॉक लागला. गेली कित्येक वर्षे राणे व इतर बाधित ग्रामस्थ ही हाय टेन्शन वीज प्रवाह असलेली लाईन काढून टाकण्यासाठी विद्युत मंडळाकडे अर्ज, विनंती करीत आहेत, पण विद्युत मंडळाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मयताच्या पश्चात पत्नी, आई व दोन लहान मुले असून घरचा कमवता गेल्याने योग्य ती नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत चौक येथील उपअभियंता बोधनकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी घडलेली घटना दुर्दैवी असल्याचे सांगून याबाबत वरिष्ठांना कळविले आहे. त्यानुसार उद्या इलेक्ट्रिकल इन्स्पेक्टर येणार असून जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल व त्याचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात येईल. मयताच्या वारसांना मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करू, असे सांगितले.

# शुभ वर्तमान! यंदा मान्सून जोरदार बरसणार

### ‘स्कायमेट’चा अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**



गेल्या वर्षी पावसाने ओढ दिल्याने महाराष्ट्रासह देशातील बराचसा भाग दुष्काळाच्या झळा सोसू लागला आहे, तर सद्यस्थितीत अनेक नद्यांमध्ये पाणीसाठा कमी होत चालला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही बराचसा भाग हा पाण्याविना व्याकुळलेला आहे. अशात राज्याला दिलासा देणारी बातमी आली आहे. यंदा देशभरात चांगला पाऊस होण्याचा अंदाज स्कायमेट या संस्थेने व्यक्त केली आहे.

दुष्काळासाठी कारणीभूत असलेल्या अल निनोचा प्रभाव ओसरू लागला असून त्याची जागा आता ला निना घेणार आहे. याचा फायदा भारतीय उपखंडाला होणार असून मान्सून वेळेत दाखल होण्याची चिन्हे आहेत तसेच ला निनोमुळे देशभरात चांगला पाऊस होण्याची शक्यता स्कायमेटचे एमडी जतीन सिंग यांनी व्यक्त केली आहे. काही काळ अल निनोच्या एक्झिटचा परिणाम मान्सूनच्या आगमनावर जाणवणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

यंदाच्या पावसाळ्याचा दुसरा टप्पा चांगला जाणार आहे. पहिल्या टप्प्यामध्ये थोडी वाट पहावी लागू शकते. मान्सूनचा सर्वाधिक प्रभाव असलेल्या महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमध्ये पुरेसा पाऊस कोसळणार आहे. अल निनो ला निनामध्ये रूपांतरीत होताना हंगामाची सुरुवात विस्कळीत होण्याची शक्यता आहे, तर ‘स्कायमेट’ने उष्णतेच्या लाटांचे दिवस आठऐवजी १० केल्याने पुढील काही महिने उष्णतेच्या झळा तीव्र होऊ शकतात. त्यानंतर जून ते सप्टेंबर या काळात मान्सून सरासरीच्या १०२ टक्के कोसळण्याचा अंदाज आहे.





**उरण :** महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठानच्या वतीने जासई येथे उभारण्यात आलेले जिजामाता हॉस्पिटल डॉ. खोपकर फाउंडेशनने चालवायला घेतले असून गुढीपाडव्यापासून पुन्हा सुरू झाले आहे. यानिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तेथे भेट देत पाहणी केली तसेच प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या पुतळ्याला अभिवादन करून डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व ‘दिबां’चे पुत्र अतुल पाटील, प्रकाश खोपकर, डॉ. तेजस खोपकर, डॉ. पूर्वा खोपकर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, मनोज घरत, गोपीनाथ म्हात्रे, अमृत ठाकूर, प्रतिष्ठानचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# इंडिया आघाडीच्या लोकांना राम नावाचा द्वेष

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**पिलीभित : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीमध्ये पिलीभित मतदारसंघाचे भाजप उमेदवार जितीन प्रसाद यांच्या समर्थनार्थ निवडणूक रॅलीला संबोधित करण्यासाठी आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेस व इंडिया आघाडीवर जोरदार निशाणा साधला. काँग्रेसचे मन विषाने भरले असून इंडिया आघाडीतील लोक राम नावाचा द्वेष करतात, असे हल्लाबोल पंतप्रधान मोदींनी केला.

पंतप्रधान म्हणाले की, आज जगात भारताचा आवाज घुमत आहे. याचे कारण मोदी नाही. तुमच्या एका मताने हे शक्य झाले. तुमच्या एका मताने मजबूत सरकार बनले. भारत आज हे दाखवून देत आहे की, आपल्यासाठी काहीही अशक्य नाही. कधीकाळी काँग्रेसची सरकारे जगाकडे मदत मागायची, पण कोरोनाच्या संकटात भारताने संपूर्ण जगाला औषधे आणि लस पाठवली.



जगात जिथे जिथे युद्ध संकट आले तिथून आम्ही प्रत्येक भारतीयाला सुखरूप परत आणले.

पिलीभित्च्या भूमीला आई यशवंतरी देवीचा आशीर्वाद असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. येथे आदि गंगा माँ गोमतीचे उगमस्थान आहे. आज नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मी देशाला आठवण करून देत आहे की, इंडिया आघाडीने शक्तीला संपवण्याची शपथ घेतली आहे. देशात ज्या शक्तीची पूजा केली जात आहे तिचा काँग्रेसने घोर अपमान केला आहे. ज्या शक्तीपुढे आपण नमस्कार करतो, त्या शक्तीला उखडून टाकण्याची गोष्ट काँग्रेस नेते बोलत आहेत, अशी टीकाही पंतप्रधानांनी केली.

आमचे कल्याण सिंहजी यांनी आपले जीवन आणि सरकार राम मंदिरासाठी समर्पित केले. देशातील प्रत्येक कुटुंबाने आपापल्या समजुतीनुसार योगदान दिले, पण इंडिया आघाडीच्या लोकांमध्ये राम मंदिर उभारणीपूर्वीही द्वेष होता आणि आजही द्वेष आहे. अयोध्येत राम मंदिर बांधले जाऊ नये यासाठी काँग्रेसने खूप प्रयत्न केले, पण जेव्हा देशातील जनतेने एवढे भव्य मंदिर उभारण्यासाठी एक-एक पैसा दिला आणि मंदिरातील जनतेने तुमची सर्व पापे माफ करून तुम्हाला प्राणप्रतिष्ठेला आमंत्रित केले, पण तुम्ही निमंत्रण नाकारून प्रभू श्रीरामाचा अपमान केला आणि प्राणप्रतिष्ठेला गेलेल्या नेत्यांची पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी केली, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी विरोधकांचा समाचार घेतला.

# नाना पटोले यांनी इतिहासाबद्दल माहिती घेऊन बोलावे -माधव भांडारी

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यपूर्व काळातील बंगाल प्रांताच्या सरकार स्थापनेवेळी भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी मुस्लीम लीगशी नव्हे तर फजलूल हक कृषक प्रजा पार्टीशी आघाडी केली होती. काँग्रेस-मुस्लीम लीगला सत्तेत येण्यापासून रोखण्यासाठी डॉ. मुखर्जी यांनी कृषक प्रजा पार्टी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या फॉरवर्ड ब्लॉकशी आघाडी केली होती, हा इतिहास आहे. इतिहासातील घटनांबद्दल बोलताना नाना पटोले यांनी पूर्ण माहिती घेऊनच बोलावे, असा टोला भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी लगावला आहे.




डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी बंगाल प्रांतात मुस्लीम लीगशी युती केली होती, अशी खोटी माहिती प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी अलिकडेच प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. भांडारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे त्या वेळच्या घटनांची तपशीलवार माहिती देत नाना पटोले यांचा जोरदार समाचार घेतला आहे. पत्रकात म्हटले आहे की, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी अलीकडेच इतिहासाबद्दलचे आपले अगाध ज्ञान पाजळले आहे. नाना पटोले ज्या बंगाल मंत्रिमंडळाबद्दल बोलले आहेत ते सरकार मुस्लीम लीगचे नव्हते. त्या सरकारचे मुख्यमंत्री होते कृषक प्रजा पार्टीचे फजलूल हक. फजलूल हक हे समाजवादी विचारांचे आणि कट्टर मुस्लीम लीगविरोधी म्हणून ओळखले जात होते. काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांना सरकार बनविण्यापासून रोखण्यासाठी डॉ. मुखर्जी यांच्या नेतृत्वाखालील हिंदू महासभा, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा फॉरवर्ड ब्लॉक आणि फजलूल हक यांचा कृषक प्रजा पार्टी हे तीन पक्ष एकत्र आले होते. फजलूल हक यांच्या कृषक प्रजा पार्टीने मुस्लीम लीगच्या फाळणीच्या ठरावाला विरोध केला होता. अशा प्रखर राष्ट्रवादी विचारांच्या फजलूल हक यांच्याशी डॉ. मुखर्जी यांनी हातमिळवणी केली होती.

डॉ. मुखर्जी यांनी मुस्लीम लीगशी कधीच आघाडी, समझोता केलेला नव्हता. उलट काँग्रेसचा इतिहास मुस्लीम लीगबरोबरच्या मैत्रीचा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील इतिहासाचा अभ्यास करणे जमत नसेल तर किमान इतिहास समजून तरी घ्यावा आणि मगच बोलावे, असेही भांडारी यांनी पत्रकात नमूद केले आहे.

# जन्मदात्या आईनेच केला दोन चिमुरड्यांचा घात

**किहीम येथील मृत्यू प्रकरणाचे गूढ उकलले**

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील किहीम येथील दोन चिमुरड्यांच्या संशयास्पद मृत्युप्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली आहे. जन्मदात्या आईनेच या दोन मुलांना ठार मारले असून पोलिसांनी त्यांची आई शीतल पोळे हिला ताब्यात घेतले आहे. अनैतिक संबंधात अडसर ठरत असल्याने आपल्या पोटच्या गोळ्यांना संपवल्याची कबुली तिने दिली आहे.

शीतल पोळे आणि सदानंद पोळे हे मुळचे यवतमाळच्या पुसदमधील पती-पत्नी आपल्या दोन चिमुरड्यांसह किहीम येथील दाजिबा पटोले यांच्या बागेत कामानिमित्त राहत होते. ३१ मार्च रोजी दुपारी आराध्या (वय ६) आणि सार्थक (वय ५) हे दोघेही झोपी गेले. संध्याकाळी त्यांची आई शीतल त्यांना उठवण्यास गेली असता दोघेही बेशुद्धावस्थेत आढळले. त्यांना तातडीने अलिबागच्या जिल्हा रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले.

अशी कहाणी समोर आली असली तरी पोलिसांना या घटनेबाबत संशय होता. आई शीतल हिचे मोबाईल रेकॉर्ड तपासले असता, त्यात पोलिसांना संशयास्पद बाबी आढळून आल्या. त्यामुळे पोलिसांच्या तपासाला वेग आला. तिची कसून चौकशी केली असता आपणच या मुलांचे तोंड फडक्याने दाबून त्यांना ठार मारल्याची कबुली तिने दिली. पोलिसांनी शीतल हिला अटक केली असून न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

मूळची यवतमाळमधील शीतलचे साईनाथ जाधव याच्याबरोबर प्रेमसंबंध होते, परंतु त्या दोघांचे लग्न झाले नाही. तिने प्रियकराला विवाह करू दिला नाही. दोघांचे संबंध अद्यापही होते आणि दोघेही अधूनमधून भेटत असत. त्यावरून नवरा-बायकोचे सतत भांडण होत होते. साईनाथबरोबर लग्न करण्याचा तिचा इरादा होता, परंतु त्यामध्ये ही दोन मुले अडसर ठरत होती. प्रियकराला ही दोन मुले नको होती. म्हणून तिने या दोन मुलांना ठार करून अडसर दूर करण्याचा प्रयत्न केला.

या गुन्ह्याची उकल करण्यात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, उपनिरीक्षक धनाजी साठे, मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे प्रभारी सोमनाथ लांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली.

# चार मजुरांचा गुदमरून मृत्यू

**विरार : प्रतिनिधी**

विरारमधील खासगी सांडपाणी प्रकल्पात साफसफाई करण्यासाठी उतरलेल्या चार मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला. मंगळवारी (दि. ९) सकाळी ११.३०वा. च्या सुमारास ही दुर्घटना घडली.

ग्लोबल सिटी येथे सांडपाणी प्रकल्प आहे. मंगळवारी चार मजूर प्रकल्पाच्या टाक्यांची साफसफाई करण्यासाठी उतरले होते. या टाक्या २५ ते ३० फूट खोल होत्या, मात्र त्या वेळी गुदमरून चार मजुरांचा मृत्यू झाला. शुभम पारकर (२८), अमोल घाटाळ (२७) निखिल घाटाळ (२४) आणि सागर तेंडुलकर (२९) अशी मृतांची नावे आहेत. यापैकी तिघांचे मृतदेह बाहेर काढले, तर चौथ्याचा शोध सुरू होता.

# खोपोली भाजप नूतन कार्यालयात गुढी उभारून प्रवेश



**खोपोली : प्रतिनिधी**

शहर भाजप मध्यवर्ती नूतन कार्यालयात पारंपरिक गुढी उभारून प्रवेश करण्यात आला.

शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन इमारती भाजपचे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन माजी आमदार सुरेश लाड यांच्या हस्ते झाले होते. या कार्यालयात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर गुढी उभारून प्रवेश करण्यात आला. या गुढीचे पूजन जिल्हा उत्तर रायगडच्या महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांच्या हस्ते पूजाविधी झाले.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, कर्जत खालापूर विस्तारक हेमंत नांदे, शहर सरचिटणीस राहुल जाधव, कामगार आघाडी जिल्हा सेलचे सूर्यकांत देशमुख, ओबीसी सेलचे सुनील नांदे, व्यापारी सेलचे कीर्ती ओसवाल, त्याचप्रमाणे शहर पदाधिकारी उपस्थित होते.

# माणगावात खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे हे दोन लाख मतांच्या फरकाने विजयी होतील, असा दावा शिवसेना उपनेते आमदार भरत गोगावले यांनी माणगाव येथे केला.

सुनील तटकरे यांचे प्रचार कार्यालय जुने बसस्थानक येथे सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते व महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



या वेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुभाष केकाणे, दक्षिण रायगड शिवसेना संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण, भाजपचे ज्येष्ठ नेते संजयआप्पा ढवळे, प्रदेश भाजप महिला मोर्चा सचिव यशोधरा गोडबोले, युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख अॅड. महेंद्र मानकर, माजी सभापती संगीता बक्कम, प्रकाश लाड, माजी उपसभापती तुकाराम सुतार, भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, जिल्हा युवक राष्ट्रवादी कार्याध्यक्ष शादाब गैबी, तालुका राष्ट्रवादी उपाध्यक्ष गणेश चव्हाण, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, तालुकाध्यक्ष उमेश साटम, सरचिणीस गोविंद कासार, माजी उपनगराध्यक्ष दिलीप जाधव, नगरसेविका ममता थोरे, नगरसेविका लक्ष्मी हिलम, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, तालुका महिला राष्ट्रवादी उपाध्यक्ष श्रद्धा यादव, किशोरी हिरवे, देविका पाबेकर, संतोष दसवते, सौरभ खैरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# म्हसळा वाचनालयात उभारली पुस्तकांची गुढी

**म्हसळा : प्रतिनिधी**

येथील केशवराव खाबेटे सार्वजनिक वाचनालयाने विविध धार्मिक पुस्तकांची गुढी उभारून वाचन संस्कृती संवर्धनाचा संकल्प केला. वाचनालयात गेले दोन वर्षे पुस्तकांची गुढी उभारत आहेत.

पुस्तकांची गुढी उभी करून शिक्षण ही काळाची गरज असल्याचा संदेश केशवराव खाबेटे वाचनालयातर्फे दिला गेला. या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खाबेटे यांच्या हस्ते विविध धार्मिक ग्रंथांचे आणि भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वाचनालयाचे संचालक पांडुरंग पाटील, ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगले, दत्ता पांडव, शिंदे आण्णा आदी उपस्थित होते. सुमारे २०० धार्मिक ग्रंथांचे प्रदर्शन या वेळी भरविण्यात आले होते.



# मुरूड गोयगान येथील शेकापचे कार्यकर्ते शिवसेनेत दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

खारआंबोली ग्रामपंचायतीमधील गोयगान गावातील शेकापच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. शिवसेनेचे नेते व नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाई सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम करण्यात आला. या वेळी दांडा येथील भाई सुर्वे यांच्या निवासस्थानी हा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम घेण्यात आला होता.



या वेळी उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, शिवसेना नेते भाई सुर्वे, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, उपतालुका प्रमुख मनोज कमाने, निलेश घाटवळ, सी. एम. ठाकूर, युवा सेनेचे नेते अमोल लाड, गणेश मोंनाक, मनोहर पाटील, जितेंद्र दिवेकर, विघ्नेश सुर्वे, गणेश गोसावी आदी उपस्थित होते.

गोयगान येथील शेकापचे कार्यकर्त्यांकडे सरपंच व पदाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे कंटाळून आम्ही शिवसेनेत प्रवेश करीत असल्याचे या वेळी प्रवेशकर्त्यांनी सांगितले. शेकापमधून निलेश मिणमिने, राजेश मेहत्तर, योगेश चोगले, सुधीर मिणमिने, पंकज मेहत्तर, राहुल मेहत्तर, विनायक चोगले, किरण मेहत्तर, केतन मेहत्तर, क्रिश मेहत्तर आदींसह इतर कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये नववर्ष शोभायात्रा उत्साहात

शोभायात्रेनिमित्त एक ते सात वर्ष, आठ ते १५ वर्ष आणि खुल्या गटात वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विजयी झालेल्यांना आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष तथा आयोजक अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

या शोभायात्रेत भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी तसेच संजय जैन, संजय भगत, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, झोपडपट्टी सेलचे शहराध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष चिन्मय समेळ, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, केदार भगत, प्रितम म्हात्रे, रूपेश नागवेकर, स्वाती कोळी, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह विविध संस्था, संघटना, मंडळांचे पदाधिकारी आणि पनवेलकर नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विंधणे शाळा ठरली उत्कृष्ट पुरस्काराची मानकरी

**उरण : प्रतिनिधी**

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी ग्रामीण भागातील रायगड जिल्हा परिषदेच्या उत्कृष्ट प्राथमिक शाळा योजनेंतर्गत उरण तालुक्यातून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विंधणे या शाळेने उत्कृष्ट शाळा पुरस्कार मिळवला असून, शाळा दोन लाख रुपयांच्या बक्षिसाची मानकरी ठरली आहे. त्यामुळे सर्व स्तरातून विंधणे प्राथमिक शाळा ही कौतुकास पात्र ठरली आहे.




विंधणे येथील प्राथमिक शाळा ही इ. पहिली ते सातवीपर्यंतची शाळा असून या शाळेची इमारत दुमजली बांधण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गेल्या चार-पाच वर्षांमध्ये परिपूर्ण व सर्व सुविधांनी सुसज्ज अशी बनली आहे. शाळेमध्ये सिमेंस कंपनी मार्फत संगणक कक्षाची सुरुवात केली आहे.

येथील विद्यार्थ्यांना दररोजच्या तासिकेतून संगणक शिक्षण दिले जात आहे. शाळेला ई-बालभारतीकडून व्हर्चुअल क्लासची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेत आहेत. त्याचबरोबर शाळेला शासनाकडून नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र मिळाले आहे. या विज्ञान केंद्रामध्ये वैज्ञानिक मॉडेल्स असून, विद्यार्थी या मॉडेल्सची स्वतः हाताळणी करतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये प्रयोगशील वृत्तीची वाढ होताना दिसत आहे.

शाळेला सुसज्ज असे वाचनालय असून या वाचनालयामध्ये एक हजाराहून अधिक पुस्तके आहेत. विद्यार्थ्यांना या वाचनालयामुळे वाचनाची आवड निर्माण झाली आहे.

शाळेने आजपर्यंत लोकवर्गणीतून भौतिक सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. यावर्षी शाळेची रंगरंगोटी आणि सजावटीकरिता सुमारे एक लाख ५० हजारांची मदत ग्रामस्थांकडून मिळाल्याने शाळेत वैविध्यपूर्ण उपक्रम घेतले जातात. शालेय परिपाठ तसेच विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक केली जाते. हे सर्व पाच वर्षांच्या अथक परिश्रमांचे हे यश आहे.

# आरपीएफकडून १०६४ मुलांची सुटका

**ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मोहीम यशस्वी**

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली असून ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मुलांना वाचवण्याची जबाबदारीही पार पाडत आहे. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत सरकारी रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि इतर फ्रंटलाइन रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने १०६४ मुलांची मध्य रेल्वेच्या स्टेशनवरून सुटका केली आहे. जी मुले काही भांडणामुळे, काही कौटुंबिक समस्यांमुळे, चांगल्या आयुष्याच्या शोधात किंवा शहराच्या ग्लॅमरच्या शोधात आपल्या कुटुंबियांना न सांगता रेल्वेस्टेशनवर येतात त्यांना प्रशिक्षित आरपीएफ कर्मचाऱ्यांनी शोधले आहेत. हे प्रशिक्षित आरपीएफ कर्मचारी मुलांशी संपर्क साधतात. त्यांच्या समस्या समजून घेतात आणि त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा एकत्र येण्यासाठी सल्ला देतात.

एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत सुटका करण्यात आलेल्या मुलांचे विभागनिहाय तपशील पाहता मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने ३१२ मुलांची सुटका, भुसावळ विभागात सर्वाधिक ३१३ मुलांची सुटका, पुणे विभागाने २१० मुलांची सुटका, नागपूर विभागाने १५४ मुलांची सुटका, सोलापूर विभागाने ७५ मुलांची सुटका केली.

# पनवेलमध्ये मतदान यंत्राचे वितरण सुरू

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीकरीता वापरण्यात येणाऱ्या मतदान यंत्राचे मंगळवारी (दि.९) पनवेल येथील वखार महामंडळ गोदामातील मतदान यंत्र वितरण केंद्रातून राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत वितरण सुरू झाले. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वितरण केंद्राला भेट देवून प्रक्रियेची पाहणी केली.



रायगड जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघांसाठी मतदान यंत्र वितरण होणार आहे. या वेळी रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड आणि निवडणूक यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

मतदान यंत्र वितरण प्रक्रिया पारदर्शकपणे करावी. वितरणाचे कामकाज अचूक करावे, यंत्राची वाहतूक करताना सुरक्षाविषयक नियमांचे तंतोतंत पालन करावे. ईव्हीएम यंत्राची वाहतूक करताना निवडणूक आयोगाच्या सर्व निर्देशांचे पालन व्हावे, असे निर्देश जिल्हाधिकारी जावळे यांनी या वेळी दिले.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील यंत्र स्वीकारण्यासाठी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र योग्य ठिकाणी जावे म्हणून मतदारसंघनिहाय विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट वितरणासाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले असून या कक्षात विशेष कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मंगळवारी पहिल्या दिवसाची सुरूवात कंट्रोल युनिटच्या वितरणाने करण्यात आली.

जिल्हास्तरीय सरमिसळ (रँडमायझेशन) प्रकियेनंतर प्राप्त यादीनुसार वितरण कक्षामधील ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट शोधून त्यांची संबंधित मतदारसंघाला वितरण करण्यात आल्याची नोंद करण्यात येत आहे. वितरणासंदर्भातील मदतीकरीता स्वतंत्र मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. वितरीत केले यंत्र जीपीएस यंत्र असलेल्या वाहनातून पोलीस बंदोबस्तात त्या त्या विधानसभा मतदारसंघाच्या स्ट्राँग रुम नेण्यात येतील, अशी माहिती रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी दिली आहे.

# सराईत तोतया पोलीस गजाआड

## पनवेल परिसरातील चार गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे.



सुमित्रा रामचंद सोनगार (वय ६०, रा. वावंजे मु. पोस्ट तालुका पनवेल) हिला एका व्यक्तीने पोलीस असल्याचे बतावणी करून तसेच जवळच एका घरात घरफोडी झालेली असून गुन्ह्यातला मुद्देमाल तपासायचा आहे. तुमचे सोने दाखवा असे सांगून त्यांचे सोने बतावणी करून घेऊन गेला म्हणून या घटनेवरून पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०६/२४ आयपीसी ४२०, १७० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

गुन्ह्याचा तपास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, सतीश तांडेल, सोनकांबळे, भीमराव खताळ, किरवे करीत असताना ८० ते ८५ सीसीटीव्ही फुटेज बघून वावंजेगाव ते बदलापूर असे रोड लगत सीसीटीव्ही फुटेज याची तपासणी करून त्याचबरोबर जेल रिलीज यातील आरोपीची माहिती घेऊन त्याचे तांत्रिक विश्लेषण करून या गुन्ह्यांमध्ये विशाल बाळासाहेब सगलगीले (वय ४०, रा.बदलापूर) यास ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपीकडे चौकशी केली असता त्याने हा गुन्हा केल्याचे कबूल केलेले आहे. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली हिरो होंडा स्प्लेंडर, पोलिसांचा गणवेश जप्त केला असून त्याच्यावर यापूर्वी खारघर, तळोजा, एनआरआय व पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. याबाबत पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत करीत आहेत.



पनवेल : गुढीपाडवा आणि मराठी नववर्षानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेमध्ये शहरातील रेखी हॉटेलच्या सौजन्याने वडापाव, चहा, पाणीवाटप करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका चारूशीला घरत, दर्शना भोईर, राजश्री वावेकर तसेच सुभाष रेखी, ब्रिजमोहन रेखी, अलका रेखी, सुशांत रेखी, सौ. देशमुख, भाजप कार्यकर्ते रत्नदीप देशमुख, संजय देशमुख आदी उपस्थित होते.

## निवडक

### उरणमध्ये अपघातात दाम्पत्याचा मृत्यू

**उरण :** रेल्वे स्टेशन जवळ बोकडविरा वरून उरणकडे जाताना मुख्य रस्त्यावर सोमवारी रात्री १०:४८ वाजन्याच्या सुमारास फोर व्हिलर कारने स्कूटीवरील चालक व त्याच्या सोबत असलेल्या कुटुंबियांना जोरदार धडक दिली. या धडकेत स्कुटीवरील चालक पवित्र मोहन बराल (वय ४०), त्यांची पत्नी रश्मिता बराल (वय ३७) राहणार बोरी पाखाडी, उरण, हे जागीच मृत्यूमुखी पडले. तर त्यांची लहान मुलगी परी बराल हिला नवी मुंबईमधील अपोलो हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच उरण पोलिसांनी घटना स्थळी धाव घेतली. फिर्यादी अतुल राजेंद्र चव्हाण (वय २६) आरसीएफ पोलीस कॉन्स्टेबल याच्या तक्रारी वरून क्रेटा कार (एमएच ४६ बीव्ही ५०००) या वाहनाचे चालक जय चंद्रहास घरत यांच्यावर मोटार वाहन अधिनियमनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** पलावा येथील कंपनीतून नावडे येथे घरी परतणाऱ्या तरुणाच्या स्कूटीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. तळोजा पोलिसांनी या अपघातप्रकरणी अज्ञात वाहनचालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव शुभम म्हात्रे (वय २७) असे असून तो नावडे गावात कुटुंबासह राहत होता. तसेच, तो तळोजामधील लोढाच्या पलावा येथील कंपनीत कामाला होता. शुभम कामावरून सुटल्यानंतर स्कूटीवरून तळोजा एमआयडीसीतील असाई इंडिया ग्लास कंपनीसमोर आला असताना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्याच्या स्कूटीला धडक दिली. या अपघातात शुभम जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

### खड्ड्यात पडून मुलाचा मृत्यू

**पनवेल :** बांधकाम व्यवसायिकाने इमारतीच्या सांडपाण्याच्या पाण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात बुडून एका मुलाचा मृत्यू झाल्याची घटना आकुर्ली घडली आहे. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिसरी इयत्तेत शिकणारा करणकुमार अजय प्रसाद मेहता (मुळगाव झारखंड) याचे कुटुंबीय आकुर्ली गावात राहतात. सात एप्रिल रोजी करण कुमार हा खेळण्यासाठी मागे गेला होता. या ठिकाणी एका बांधकाम व्यावसायिकाच्या इमारतींचे काम सुरू आहे. या बांधकाम व्यवसायिकाने सांडपाण्याच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी अन्य जागेत मोठा खड्डा खोदला आहे. त्या खड्ड्यात बुडून करणकुमार याचा मृत्यू झाला.



# जेएनपीटीच्या कामगार नेत्यांची निर्दोष मुक्तता



**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

जेएनपीटी वर्कर्स युनियन तर्फे कामगारांच्या विविध मागण्या संदर्भात प्रशासनाच्या विरोधात ७ जानेवारी २०२२ रोजी लाक्षणिक उपोषण केले होते. त्या संदर्भात युनियनच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. त्या गुन्ह्यांमधून उरण न्यायालयाने रवींद्र पाटील, सुरेश पाटील, बी. के. ठाकूर, प्रकाश नाचरे, जे. के. भोईर आणि मंगेश ठाकूर या सर्व जणांची शनिवारी (दि. ६) निर्दोष मुक्तता केली आहे.

युनियनच्या वतीने प्रशासानासोबत वेळोवेळी बैठका घेऊन कामगारांच्या भवितव्यासंदर्भात प्रशासनाने लेखी करार करावा, मयत कामगारांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यात यावे, तसेच निवृत्त कामगारांच्या वारसांना वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी हे आंदोलन करीत होतो, परंतु, प्रशासन दाद देत नव्हती त्याच्या निषेधार्थ ७ फेब्रुवारी २०२२ रोजी लाक्षणिक उपोषण केले होते. याचाच मनात राग धरून प्रशासनाने कामगार नेत्यांवर गुन्हे दाखल केले होते.

शनिवारी पदाधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता झाली. संघटनेच्या वतीने ॲड. रत्नदीप पाटील, अमर पाटील यांनी न्यायालयात भक्कमपणे कामगारांची बाजू मांडली.



उलवे नोड : सकल हिंदू समाजातर्फे शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक या शोभायात्रेत सहभागी झाले होते.

# उरण ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे शोभायात्रा

**उरण : वार्ताहर**

गुढीपाडवा निमित्त उरण जेष्ठ नागरिक मंडळ वतीने मंगळवार (दि. ९) शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभा यात्रेत उरण ज्येष्ठ नागरिक मंडळ, विश्व हिंदू परिषद, श्री राममंदिर ट्रस्ट आदी सदस्य सहभागी झाले होते.

शोभा यात्रेस उरण नगर परिषदचे डॉ . नानासाहेब मुलांची शाळा क्रमांक ३, पेन्शनर पार्क, उरण येथून सुरुवात झाली. स्वामी विवेकानंद चौक, गांधी चौक, एनआय हायस्कूल, स्वामी विवेकानंद चौक, पेन्शनर पार्क, येथे येवून सांगता समारोप करण्यात आला. सर्वांना फराळ व चहा देण्यात आला.



या शोभा यात्रेत उरण ज्येष्ठ नागरिक मंडळचे अध्यक्ष हसमुख भिंडे, सेक्रेटरी अरुण मोदी, श्री राममंदिर ट्रस्टचे ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर, विश्व हिंदू परिषद उरण तालुका अध्यक्ष मोहन पार्टे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, हितेश शाह, अजित भिंडे, कुणाल शिसोदिया, कैलास शिसोदिया, हस्तीमल मेहता, विशाल पाटेकर, पत्रकार दिनेश पवार, विकास पाटेकर, चंद्रकांत गायकवाड, मकरंद पोतदार, संतोष पवार, सीमा घरत, भावना घाणेकर, शर्मा सर, एस.एस. पाटील, संगीता पवार, चंद्रकांत गायकवाड, कुणाल शिसोदिया, यश वैवडे, पार्थ अहिरे, प्रतीका अमृते, स्वप्नील रावते, भारत पाटील, शर्मा सर, मोहन पार्टे, बादुल म्हात्रे, दिनेश ठक्कर, एस. एस.पाटील, एन.आय हायस्कूल विद्यार्थी, महिला वर्ग, महिला मंडळ उरण आदी नागरिक सहभागी झाले होते.



पनवेल : चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा हा सण साजरा केला जातो. घरोघरी गुढ्या उभारल्या जातात. अनेकजण देवापुढे नैवेद्य दाखवण्यासाठी गोडधोड पदार्थ बनवतात. या हिंदू नववर्षाचे स्वागत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या निवासस्थानी कुटुंबासोबत गुढी उभारून केले.





पनवेल : भाजप युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी अमेय देशमुख, प्रवीण मोरबाळे, विजय शिंदे, आदित्य देशमुख, ऋतिक जगे, अक्षय शेळके आदी उपस्थित होते.





पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी वहाळ येथील साई मंदिरात भेट देत दर्शन घेतले. या वेळी श्री साई मंदिर, साई नगर, वहाळ देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष रविशेठ पाटील, बाळाराम पाटील व आदींनी अरुणशेठ भगत यांचे स्वागत केले.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे स्वीय सहाय्यक दत्ता कुऱ्हाडे यांना वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी राजू झांबरे, अमित जाधव, शरद ढोबरे, राजेश शेट्टे, संजय कोळी आदी उपस्थित होते.



पनवेल : गुढीपाडवा शोभायात्रेनिमित्त केदार भगत मित्र परिवारकडून श्रीखंड वाटप करण्यात आले.



पनवेल : गुढीपाडवा आणि मराठी नववर्षानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेमध्ये ओम चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळ, टपाल नाकाच्या वतीने यात्रेत सहभागी नागरिकांना सरबताचे वाटप करण्यात आले. या वेळी मंगेश पिलविळकर, कुणाल खैरे, दिव्वेश वावा, राम पाटील, गणेश पिलविळकर, चैतन्य सोनावणे तारंग पिलविळकर, अभिजित देसाई आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# दुष्काळाचे सावट

लोकसभेच्या निवडणुका तोंडावर असल्याने स्वाभाविकपणे विरोधकांपैकी काही नेत्यांनी दुष्काळाच्या नावाने सरकारवर टीका करण्याची संधी साधली आहे. पण परिस्थितीत काही आशेचे दुवेही आहेत. कोयना उर्फ शिवसागर धरण अद्याप ५० टक्के भरलेले आहे. गेल्या वर्षी अपुऱ्या पावसामुळे धरण शंभर टक्के भरलेले नसताना आणि चालू वर्षी उन्हाची तीव्रता अधिक असतानाही हा साठा समाधानकारक आहे, परंतु अशा सकारात्मक गोष्टींविषयी विरोधक चकार शब्द काढणार नाहीत.

**गेली काही वर्षे महाराष्ट्र सातत्याने नैसर्गिक आपत्तींनी झोडपला जातो आहे. उन्हाळा आला की दुष्काळाच्या झळा आणि पावसाळ्यात ओल्या दुष्काळाचे अस्मानी संकट जणु काही राज्याच्या पाचवीला पुजल्यासारखे झाले आहे. महाराष्ट्रासोबतच देशाच्या इतरही काही भागांमध्ये दृष्काळसदृश परिस्थिती समोर येऊ लागली आहे. काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मागवणे सुरू झाले आहे. लवकरच सरकारला चारा छावण्या सुरू कराव्या लागतील असेही दिसते आहे. दुष्काळसदृश परिस्थिती ओढवण्याची शक्यता ध्यानात घेऊन सुरूवातीपासूनच नीट नियोजन केल्यामुळे कोयना धरणात जुलैपर्यंत पुरेल एवढा म्हणजे ५२.६७ टीएमसी इतका पाणीसाठा शिल्लक आहे. अर्थात तसे असले तरी, राज्यातील इतर अनेक छोटे-मोठे जलसाठे, ओढे, नाले कोरडे पडले आहेत हे नाकारता येणार नाही. दिवसेंदिवस हे चित्र चिंताजनक होत जाण्याची शक्यताही आहे, परंतु महायुतीचे शिंदे-फडणवीस-पवार सरकार हे कृतीशील सरकार आहे. लोकसभा निवडणुकांमुळे आचारसंहिता लागू असली तरी त्यामुळे हे सरकार काहीही न करता बसून राहणार नाही याची जनतेलाही खात्री आहे. दुसरे म्हणजे, काही न केले तर निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षांना ते अडचणीचे ठरेल हेही स्वाभाविकच आहे. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा उपाययोजनांकडे निश्चितच बारकाईने लक्ष देते आहे. विरोधकांच्या हातात आयते कोलीत न पडू देण्याची काळजी सत्ताधारी घेतीलच, पण त्यामागे जनतेविषयीची प्रामाणिक कळकळ अधिक असेल. आचारसंहितेमुळे मंत्री व राजकीय नेत्यांवर निर्बंध असले तरी प्रशासकीय यंत्रणा आपले काम सुरळीत सुरू ठेवूच शकते. राज्य सरकारने महिनाभरापूर्वीच त्या दिशेने पावले उचलली आहेत. दुष्काळग्रस्त भागांची व्याप्ती वाढवताना गेल्याच महिन्यात आणखी २२४ महसूल मंडळांचा समावेश करण्यात आला होता. २०२३ मध्ये या महसूल मंडळांच्या परिसरात सरासरीच्या ७५ टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस पडल्याने सरकारने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. दुष्काळात पिण्याचे पाणी, चारा टंचाई तसेच बेरोजगारी या प्रमुख आघाड्यांवर सरकारला लक्ष द्यावे लागते. बेरोजगारीमुळे शेतमजूर स्थलांतर करतात. त्यामुळे त्यांना रोजगार हमी योजनेंतर्गत काम मिळवून देण्याकडेही लक्ष आहे. सामाजिक संस्थांनाही या काळात सरकारच्या प्रयत्नांना जोड देता येईल. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, कृषीपंपांच्या वीजबिलात सूट, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकरचा वापर होतो आहे का याची माहिती सामाजिक संस्थांनीही सरकारच्या निदर्शनास आणावी, असे आवाहन सरकारच्या वतीने यापूर्वीच करण्यात आले आहे. स्वयंसेवी संस्था व प्रशासकीय यंत्रणा यांच्यातील समन्वयातून जास्तीत जास्त दुष्काळग्रस्तांपर्यंत विविध सरकारी योजना पोहचवणे शक्य होऊ शकते. गेल्या दीड वर्षाच्या काळात शिंदे-फडणवीस सरकारने मंजुरी दिलेल्या कामांमुळे राज्यातील १५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. दुष्काळी भागाच्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी निधीची कमतरता हे सरकार पडू देणार नाही याची जनतेलाही खात्री आहे.**

# विरोधकांनाही वाटते सुनील तटकरे विजयी होतील!

**खबरबात**
**नितीन देशमुख**

रोहा तालुक्यातील चणेरेचे प्रकाश विचारे हाडाचे कार्यकर्ते पहिल्यापासून काँग्रेस विरुध्द सुनील तटकरेंचे विरोधकच पण दोन दिवसांपूर्वी भेटेल तेव्हा म्हणाले, लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेसच्या सुनील तटकरेंचाच प्रचार करणार ते निवडून आलेच पाहिजेत थोडे आश्चर्य वाटले. मग त्यांनी खुलासा केला अनंत गीते तीन वेळा खासदार होते. मंत्री होते पण त्यांनी मतदारसंघात काहीच काम केले नाही. कोणाला भेटत ही नव्हते. मी सुनील तटकरेंच्या विरोधात असलो तरी ते निवडून यायला हवेत या मताचा आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी तर हवेतच पण रोहयाचा डॉ. सी. डी. देशमुख नंतर केंद्रात मंत्री होण्याची संधि त्यांना मिळू शकते. त्यामुळे अनेक योजना, प्रकल्प रायगड मध्ये येऊ शकतात. गीते निवडून आल्यास काहीच मिळणार नाही असेच अनेकांना वाटते.

डॉ. सी. डी. देशमुख हे रायगड (तेव्हाचं कुलाबा)चे पहिले म्हणजे १९५२ साली खासदार म्हणून निवडून गेले. स्वत: पंडित नेहरू त्यांच्या प्रचारासाठी रोहा या देशमुखांच्या गावी आल्याच्या आठवणी आजही इथले बुजूर्ग सांगतात. कष्टकऱ्यांचे नेते म्हणून पुढे देशभर नावाजले ते दि. बा. पाटीलही इथून संसदेत गेले होते, तर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुलेही इथून खासदार बनले होते. बॅरिस्टर अंतुलेंनीच पुढे कुलाबा जिल्ह्याचं नाव रायगड केलं. कुणाही 'करिष्माई' व्यक्तीच्या लाटेला न जुमानणारा किंवा कुठल्याही 'आकस्मिक' घटनेच्या आहारी न जाणारा मतदारसंघ म्हणून रायगड लोकसभा मतदारसंघ ओळखला जातो. १९८४ साली इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत देशभर पसरलेल्या सहानुभूतीच्या लाटेने काँग्रेसला अभूतपूर्व यश मिळवून दिले, पण रायगडमध्ये लाट चालली नाही आणि शेतकरी कामगार पक्षाचे दि. बा. पाटील हे काँग्रेसचा पराभव करत संसदेत पोहचले होते. २०१४ साली 'मोदीलाट' देशभरात असतानाही, रायगडमध्ये शिवसेना-भाजप युतीच्या अनंत गीतेंना काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सुनील तटकरेंनी शेवटच्या फेरीपर्यंत टक्कर दिली होती. अवघ्या दोन हजार मतांनी तटकरेंना पराभव स्वीकारावा लागला होता. तेही सुनील तटकरे यांच्याच नावाचे आणखी काही उमेदवार उभे असल्याचा फटका बसल्याचं दिसून आले. २०१९मध्येही बऱ्यापैकी 'मोदीलाट' अस्तित्वात असूनही रायगडमध्ये युतीच्या अनंत गीतेंचा सुनील तटकरेंनी पराभव केला.

रायगड लोकसभा मतदारसंघ हा मतदारसंघ २००८ मध्ये तयार करण्यात आला आहे. या मतदारसंघात पहिल्यांदा निवडणूक झाली. २००९ आणि त्याचे पहिले खासदार शिवसेनेचे अनंत गीते होते जे २०१४च्या निवडणुकीत पुन्हा निवडून आले. २०१९च्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांनी ३१,४३८ मतांनी विजय मिळवला आणि विद्यमानअनंत गीते यांचा पराभव केला.

रायगड हा मावळपासून रत्नागिरीपर्यंत पसरलेला मतदारसंघ आहे. आताच्या रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यात २००९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पूर्वीपर्यंत कुलाबा, राजापूर आणि रत्नागिरी असे मतदारसंघ होते. २००८ साली मतदारसंघ पुनर्रचना झाली. त्यानंतर रायगड आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग असे दोन मतदारसंघ तयार झाले. यातील रायगड मतदारसंघ मावळपासून गुहागरपर्यंत अशा विस्तीर्ण भूभागावर पसरला आहे. रायगडमधील अलिबाग, पेण, श्रीवर्धन, महाड, तर रत्नागिरीतील दापोली, राजापूर असे एकूण सहा विधानसभा मतदारसंघ रायगड लोकसभा मतदारसंघात मोडतात. आता रायगड लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे हे प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. या दोघा नेत्यांभोवती जिल्ह्याचे राजकारण फिरताना दिसून येते.

सुनील तटकरे हे रायगडचे विद्यमान खासदार आहेत. ते राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात आहेत आणि त्या पक्षाचे प्रदेशाध्यक्षही आहेत. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात झालेल्या 'राजकीय संगीत खुर्ची'मुळे मोठी राजकीय उलथापालथ झाली. या उलथापालथीचा परिणाम रायगडमध्येही झाला आणि कुणाही सर्वसामान्य मतदाराला चक्रावून टाकणारी समीकरणे इथं तयार झाली आहेत. सर्वसामान्यच काय, राजकीय क्षेत्राबाबत सातत्यानं जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्यांनाही ही समीकरणं गोंधळात टाकतात.

पक्षफुटीआधी एकट्या शिवसेनेचे चार आमदार इथे होते. म्हणजे, शिवसेनेची ताकद होती, असे मानायला हरकत नाही, मात्र आता शिवसेनेतच फूट पडल्याने ती ताकदही विभागली गेलीय. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात शिवसेनात बंड झाले आणि रायगड लोकसभा मतदारसंघातल्या चारपैकी तीन शिवसेना आमदारांनी शिंदे गटाची वाट धरली. गुहागरचे आमदार भास्कर जाधव तेवढे उद्धव ठाकरेंसोबत राहिले. दुसरीकडे, २०१९ लोकसभा निवडणुकीवेळी शेकपाचे आमदार असलेले धैर्यशील पाटीलही आता भाजपमध्ये दाखल झाले आहेत. त्यामुळे आकडेवारीनुसार खरंतर आता भाजपप्रणित महायुतीकडे सहापैकी पाच आमदार आहेत खरे, पण तरीही इथली लढाई चुरशीची असेल, असे राजकीय विश्लेषकांना वाटते.

रायगड लोकसभा मतदारसंघात रोजगाराचा मोठा मुद्दा दिसून येतो. या मतदारसंघातील मोठा भूभाग ग्रामीण आहे आणि या ग्रामीण भागातील अनेक गावांमधील लोक रोजगाराच्या कारणाने मुंबई, ठाणे, पालघरकडे स्थलांतरित होताना दिसतात. विशेष म्हणजे, रसायनी, धाटाव आणि महाड-पोलादपूर अशा तीन एमआयडीसी या मतदारसंघात आहेत, मात्र तरीही हे स्थलांतर रोखण्यात आजवर राजकीय नेतृत्वांना यश आलेलं दिसून येत नाही. आरोग्य आणि शिक्षणाच्या दृष्टीनेही स्थलांतराचा मुद्दा रायगड लोकसभा मतदारसंघात दिसून येतो. गंभीर आजारांवरील उपचारासाठी आणि उच्च शिक्षणासाठी शहरांचीच वाट पकडण्याची वेळ इथल्या लोकांवर येते, पण येथे राजकीय समीकरणांमध्ये कोण कुणाच्या बाजूने आणि कोण कुणाच्या विरोधात हाच मुद्दा आजवरच्या बऱ्याच निवडणुकीत केंद्रस्थानी दिसून येतो.

सुनील तटकरे यांच्या मागेही कुणबी समाज मोठ्या संख्येत दिसतो. मुस्लीम मतेही लक्षणीय आहेत. हा मतदार सुनील तटकरेंच्या बाजूनं उभा राहिलेला बऱ्याचवेळा दिसून आलाय.

सुनील तटकरेंचा प्रशासनावर त्यांचा चांगला वचक आहे. त्यामुळे त्यांनी सांगितल्यावर अधिकारी कारणे सांगून फाटे फोडू शकत नाहीत याचा अनुभव मीसुध्दा माणगाव एसटी आगाराच्यावेळी घेतला आहे. त्यामुळेच सर्वसामान्य माणसाला ते आपले काम करतील अशी खात्री वाटते. त्यामुळे विरोधक ही त्यांनाच मत देतात असा अनुभव आहे. त्यामुळेच 'करिष्माई' व्यक्तीच्या लाटेला न जुमानणारा किंवा कुठल्याही 'आकस्मिक' घटनेच्या आहारी न जाणारा मतदारसंघ म्हणून ओळखला जाणारा रायगड लोकसभा मतदारसंघ या वेळी मात्र अपवाद ठरणार आहे. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेसचे उमेदवार सुनील तटकरे विजयी होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या, अब की बार ४०० पारचा करिष्मा दाखवून देतील यात शंका नाही.

## एकूण १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार

***रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यात पुरुष मतदारांची संख्या आठ लाख १३ हजार ५१५ आहे, तर स्त्री मतदारांची संख्या आठ लाख ४० हजार ४१६ आहे. शिवाय चार तृतीयपंथी मतदार आहेत. पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या २६ हजार ९०१ ने अधिक आहे. त्यामुळे दिल्लीतील लोकसभेत रायगडचा खासदार कोण पाठवायचा हे महिला मतदार ठरवणार आहेत.***

**लोकसभा मतदारसंघात दोन जिल्ह्यांतील सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश आहे. हे मतदारसंघ पुढीलप्रमाणे**

| रायगड जिल्ह्यातील | सदस्य | पक्ष |
|---|---|---|
| पेण | रविशेठ पाटील | भाजप |
| अलिबाग | महेंद्र दळवी | शिवसेना |
| श्रीवर्धन | आदिती तटकरे | राष्ट्रवादी |
| महाड | भरतशेठ गोगावले | शिवसेना |
| **रत्नागिरी जिल्ह्यातील** | **सदस्य** | **पक्ष** |
| दापोली | योगेश कदम | शिवसेना |
| गुहागर | भास्कर जाधव | शिवसेना (उबाठा) |

**पेण, अलिबाग आणि श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ पूर्वीच्या कुलाबा लोकसभा मतदारसंघाचा भाग होता. महाड हा पूर्वी रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाचा भाग होता.**



## बदलते तंत्रज्ञान

# आयफोन मेकर ॲपल भारतात 'या' राज्यात घरे बांधणार



स्मार्टफोन मेकर ॲपल कंपनी महागडे आयफोन किंवा विविध उत्पादने बनवण्यासाठी ओळखली जाते. पलने भारतातही आपला स्मार्टफोनचा प्लांट उभारला आहे. पण, आता ॲपलभारतात घरे बांधण्याच्या तयारीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनी भारतात सुमारे ७८००० घरे बांधण्याची योजना आखत आहे. चीन आणि व्हिएतनामच्या धर्तीवर भारतात घरे बांधली जातील.

मीडिया रिपोर्ट्सनुसार कंपनीने आतापर्यंत भारतातील सुमारे १.५ लाख लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. आता कंपनी आपल्या याच कर्मचाऱ्यांना निवासी सुविधा देण्यासाठी घरे बांधण्याचा विचार करत आहे. ही घरे पीपीपी म्हणजेच सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत बांधली जातील. या योजनेअंतर्गत ७८००० घरांची निर्मिती केली जाईल.

**सर्वाधिक फायदा तामिळनाडूला होणार**

या प्रकल्पातील बहुतांश घरे तामिळनाडूमध्ये बांधण्यात येणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे. तेथे सुमारे ५८००० घरे बांधण्यात येणार आहेत. सध्या टाटा समूह, तसेच एसपीआर इंडियादेखील घरे बांधत आहेत.

**पीपीपी मॉडेल ही सर्वांत मोठी योजना**

ॲपलचे उत्पादन अशा ठिकाणी होते, जिथे औद्योगिक गृहनिर्माण संकल्पना अस्तित्वात असते. याची तयारी सध्या भारतात सुरू आहे. पीपीपी मॉडेल अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांची व्याप्ती खूप विस्तृत असेल, असे सांगण्यात येत आहे. पीपीपी मॉडेलवरील ही भारतातील सर्वात मोठी गृहनिर्माण योजना मानली जात आहे.

**खर्च कसा ठरवला जाईल?**


या योजनेबद्दल बोलायचे झाले तर या घरांच्या किमतीच्या १० ते १५ टक्के रक्कम केंद्र सरकार देणार आहे. याशिवाय उर्वरित खर्च राज्य सरकार आणि कंपन्या उचलणार आहेत. याशिवाय त्याच्या बांधकामाचे कामही खासगी कंपनीकडे सोपवले जाऊ शकते. पलचे हे पाऊल स्थलांतरित कामगारांना खूप मदत करेल आहे.

**कामगारांमध्ये ७५ टक्के महिलांचा समावेश**

फॉक्सकॉन भारतातील ॲपल आयफोनचा सर्वात मोठा पुरवठादार असून त्यांना सुमारे ३५,००० घरे देण्यात आली आहेत. कंपनीचा कारखाना तामिळनाडूच्या श्रीपेरुंबदुर येथे आहे. याशिवाय फॉक्सकॉनमध्ये सध्या सुमारे ४१,००० कामगार काम करत आहेत, त्यापैकी ७५ टक्के महिला आहेत.

# स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख

**निमित्त**



महाराष्ट्रातील एक शिक्षणप्रेमी, तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते व भारताचे कृषिमंत्री. पंजाबरावांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील पापळ खेड्यात एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे मूळ घराणे वतनदार देशमुखांचे आणि आडनाव कदम पण देशमुखी वतनामुळे देशमुख हे आडनाव रूढ झाले. त्यांचे वडील शामराव आणि आई राधाबाई. पंजाबराव देशमुख यांचा आज स्मृतीदिन त्यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया या लेखातून...

पंजाबरावांचे प्राथमिक शिक्षण पापळ येथेच झाले. अमरावतीला हिंदू हायस्कूलमध्ये मॅट्रिक होऊन (१९१८) ते पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात दाखल झाले परंतु पदवी घेण्यापूर्वीच ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले (१९२०). इंग्लंडमध्ये त्यांनी एम. ए.(एडिंबरो), डी. फिल. (ऑक्सफर्ड) आणि बार अट लॉ या पदव्या मिळविल्या. 'वैदिक वाङ्मयातील धर्माचा उद्गम आणि विकास' प्रबंधाबद्दल त्यांना डॉक्टरेट मिळाली. ऑक्सफर्ड विद्यापीठात संस्कृतचे संशोधक म्हणूनही काही दिवस काम करून ते भारतात परत आले (१९२६) व अमरावतीस त्यांनी वकिली सुरू केली.

पंजाबरावांनी १९२७मध्ये मुंबईच्या सोनार जातीतील विमलाबाई वैद्य या मुलीशी विवाह केला. त्यामुळे विदर्भात, विशेषतः मराठा समाजात खळबळ उडाली. विमलाबाई लग्नानंतर बीएएलएलबी झाल्या. त्यांचा अनेक स्त्रीसंघटनांशी निकटचा संबंध होता. पुढे त्या राज्यसभेवरही निवडून आल्या. पंजाबरावांच्या सर्व सामाजिक कार्यांत त्या हिरिरीने भाग घेत असत. पंजाबरावांनी वकिली बरोबरच समाजकार्यास प्रारंभ केला. ते अमरावतीच्या जिल्हा बोर्डात अध्यक्ष झाले (१९२८). या वेळी त्यांनी सार्वजनिक विहिरी हरिजनांसाठी खुल्या केल्या. कर वाढवून येणारा पैसा शिक्षणावर खर्च केला व प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. अमरावतीचे अंबादेवी मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यासाठी त्याच वर्षी सत्याग्रह केला. १९३०मध्ये त्यांची प्रांतिक कायदेमंडळात निवड झाली व ते शिक्षण, कृषी, सहकार आणि लोककर्म खात्यांचे मंत्री झाले. तथापि १९३३मध्ये त्यांनी राजीनामा दिला त्यानंतर अमरावती मध्यवर्ती बँकेचे ते अध्यक्ष झाले. त्यांनी बहुजन समाजाच्या विकासासाठी श्रद्धानंद छात्रालय (१९२६) व श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन केली (१९३२). त्या शिक्षण संस्थेने अल्पावधीतच अनेक शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे सुरू केली.

त्यांनी प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडविण्याकरिता भारतीय प्राथमिक शिक्षक संघ स्थापन केला. हे शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत असतानाच त्यांनी जुन्यापुराण्या शेती पद्धतीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले. ते काँग्रेसचे सभासद होते व नेताजी सुभाषचंद्र बोसांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. राजकारणापासून अलिप्त होऊन देवास संस्थानात त्यांनी काही काळ 'राजकीय मंत्री' म्हणून काम केले. स्वातंत्र्यानंतर ते काँग्रेसमध्ये सक्रिय सहभागी झाले. १९५२, १९५७ व १९६२ या तीनही वर्षांच्या लोकसभेच्या निवडणुकांत ते विजयी झाले. १९५२ ते १९६२पर्यंत ते केंद्रीय कृषीमंत्री आणि एक वर्ष सहकार मंत्री होते. या काळात त्यांनी अनेक समित्या स्थापन केल्या आणि कापूसबाजार, शेती वगैरे क्षेत्रांत आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या. या सर्व शैक्षणिक आणि सामाजिक श्रमांमुळे अखेरीस त्यांना पक्षाघाताचा झटका आला आणि दिल्ली येथे त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ अकोल्यास पंजाबराव कृषी विद्यापीठ स्थापण्यात आलेले आहे. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**




**नवी मुंबई : गुढीपाडव्याच्या निमित्ताने वाशी रेल्वे स्टेशनजवळील फँटासिया बिझिनेस पार्कमध्ये भूमिपुत्र माथाडी कामगार आणि जनरल कामगार युनियन व मैत्री परिवार (फँटासिया पार्क) यांच्या विद्यमाने सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी मतदानाचा हक्क आवर्जून बजावावा यासाठी मोठ्या आकाराची संदेशात्मक रांगोळी रेखाटण्यात आली होती. सुप्रसिद्ध रांगोळीकार श्रीहरी पवळे यांनी कल्पकतेतून ही रांगोळी साकारण्यात आली होती.**

## आरोग्य प्रहर

# व्हिटॅमिन 'बी'युक्त शाकाहारी पदार्थही देतात ऊर्जा...



सर्व पोषक घटकांप्रमाणेच व्हिटॅमिन 'बी'देखील आपल्या शरीरासाठी खूप महत्वाचे आहे, त्याशिवाय शरीराला अशक्तपणा, थकवा, आळस, अंगदुखी, हात-पाय सुन्न होणे, ऊर्जेची कमतरता यांचा सामना करावा लागू शकतो. व्हिटॅमिन बी मिळवण्यासाठी तुम्हाला मांस, मासे, अंडी आणि चिकन सारख्या गोष्टी खाव्या लागतात असे सर्वसाधारणपणे मानले जाते, परंतु सत्य हे आहे की शाकाहारी पदार्थ खाऊनदेखील आपण हे पोषण मिळवू शकता. अशाच शाकाहारी पदार्थांवर एक नजर टाकूया...

**व्हिटॅमिन बी असलेले शाकाहारी पदार्थ**

**शेंगदाणे** – प्रथिनांची गरज भागवण्यासाठी काळे चणे, हिरवे वाटाणे, चणे आणि राजमा यासारख्या गोष्टी खाल्ल्या जातात, परंतु तुम्हाला माहित आहे का की शेंगदाणे देखील व्हिटॅमिन बी चा चांगला स्त्रोत मानले जातात. त्यामुळे त्यांचे सेवन अवश्य करावे.

**दूध** – दूध हे एक संपूर्ण अन्न आहे कारण त्यात सर्व प्रकारचे पोषक घटक असतात, व्हिटॅमिन बी चा ही चांगला स्त्रोत आहे, पनीर, चीज सारख्या दुग्धजन्य पदार्थांचा वापर केल्यास आपल्याला देखील फायदा होईल. शाकाहारी लोकांना जरी दूध आवडत नसेल तरी त्यांच्यासाठी बरेच पर्याय आहेत.

**सूर्यफुलाचे बी** – आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जातात, ते शिजवून खाल्ले जाऊ शकतात किंवा त्यातून निघणारे तेल स्वयंपाकाचे तेल म्हणूनही वापरले जाते. हे व्हिटॅमिन बी, नियासिन आणि फोलेटचा समृद्ध स्त्रोत आहे.

**हिरव्या पालेभाज्या** – हिरव्या पालेभाज्या नेहमीच आरोग्यासाठी उत्तम अन्न मानल्या जातात, लोहासोबतच व्हिटॅमिन बी देखील यात आढळते. पालकाच्या हिरव्या भाज्या रोजच्या आहारात खाऊ शकता. हिरव्या पालेभाज्यांचा रस सुद्धा तुम्ही पिऊ शकता. भाजी बनविण्याआधी हलक्या गरम पाण्याने भाजी धुवावीत, जेणेकरून जंतू नष्ट होतील.

**(दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# मुरूड तालुक्यात कडधान्याचे प्रमाण घटले

## वातावरणातील बदलाचा शेतकऱ्यांना फटका

**मुरूड : प्रतिनिधी**

यंदा पावसाने नोव्हेंबर पहिल्या आठवड्यापर्यंत हजेरी लावल्याने निमगरवे व गरवे भाताची कापणी नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत केली गेली. अवकाळी पावसामुळे जमिनीत पाणी मुरल्याने कडधान्याची लागवडही हळूहळू केली जात आहे.

समुद्रकिनाऱ्यालगतच्या खारजमिनीवर वाल, चवळी, मूग व हरभरा यांसारखे कडधान्य पारंपरिक पद्धतीने घेतले जाते. या पिकांना अल्प प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. विशेषतः थंडीच्या मोसमात रात्रीच्या वेळी पडणाऱ्या दवामुळे कडधान्याला पाणी व पोषकद्रव्ये मिळत असतात. रायगड जिल्ह्यात भातशेती



आटोपल्यानंतर गावठी वालाची पेरणी होत असते.

वालाच्या शेंगा सुकून त्याचे वाल तयार होतात तेच कडवे वाल म्हणून बाजारात चढ्या भावाने विकले जातात. हे वाल प्रति किलो १२० रुपये तर वाळवून प्रतिकिलो ४०० ते ५०० रु. दराने विक्री होत आहे. तालुक्यात काललागवड क्षेत्र १७०.४४ हेक्टर, चवळी ९६ हेक्टर, मूग २५ हेक्टर तर हरभरा लागवड क्षेत्र नऊ हेक्टर असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी दिली.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानांतर्गत भातपड क्षेत्रामध्ये कडधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी स्थानिक वाण संवर्धन प्रात्यक्षिके देण्यात येतात आणि हेक्टरी ७५०० इतके अनुदान दिले जाते असे सांगितले. यंदा कडवे वालाचे प्रमाण घटले आहे. खारआंबोलीचे प्रगतीशिल शेतकरी मनोज कमाने यांनी सांगितले की, पूर्वी वालाची शेती ५-१० कुटूंब मिळून सामुहिक पद्धतीने करीत असत. अलिकडे वातावरणातील बदलामुळे वालावर किडीचे प्रमाण अधिक आढळून येते. मोकाट जनावरांचा त्रास म्हणून शेतीला कुंपण घालण्याचा खर्च परवडत नाही. रासायनिक खतांचा वापर केल्याने वालाचे उत्पादन घटत आहे.

# हरवलेला मुलगा कुटुंबियांकडे सुखरूप सुपूर्द

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील काटरंग येथील एक लहान मुलगा घरात कोणालाही काहीही न सांगता निघून गेला होता. त्याचे कुटुंबिय सर्वत्र शोध घेत असताना शहरातील शास्त्रीनगर भागात असलेल्या दर्शन शेडगे यांच्या केकवॉक या शॉपमध्ये हा लहान मुलगा सापडला.

दर्शन शेडगे यांच्या केकवॉक या शॉपमध्ये एक लहान मुलगा सकाळपासून ये-जा करीत असल्याचे लक्षात आले. दर्शन शेडगे यांनी त्या मुलाला खाऊ देऊन त्याची विचारणा केली असता त्याला त्याच्यासंबंधी काहीच माहिती सांगता येत नव्हती. त्यांनी त्वरीत यासंबंधीची माहिती अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या गुरुनाथ साठेलकर यांना दिली असता त्यांनी त्या मुलाला कोठेही जाऊ न देण्याची सूचना केली आणि याबाबत खोपोली पोलीस स्टेशन येथे कळवणे क्रमप्राप्त असल्याने सांगितले.

तत्पूर्वी सर्वांनी मिळून आजूबाजूला माहिती घेतली असता, हा मुलगा काटरंग येथून घरातून कोणालाही न सांगता सकाळीच निघून गेला होता आणि त्याचा शोध त्याचे कुटुंबीय करीत आहेत असे समजले. रुपेश गायकवाड आणि त्या मुलाच्या आईला मुलगा केकवॉक या शॉपमध्ये असल्याचे सांगण्यात आले. त्यांनी त्वरीत येऊन मुलाला ताब्यात घेतले आहे. सुदैवाने तो मुलगा दर्शन शेडगे यांना भेटला म्हणून पुढे सगळे सुकर झाले. पालकांनी अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेचे गुरुनाथ साठेलकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.



# माजगाव येथे ग्रामस्थांची आरोग्य तपासणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील माजगाव येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह त्रीतपपूर्ती सोहळ्याचे औचित्य साधून लायन्स क्लबच्या संयुक्त विद्यमाने धन्वंतरी हॉस्पिटल कळंबोली यांच्यामार्फत मोफत औषध वाटप व आरोग्य तपासणी करण्यात आली.

या वेळी सर्दी, ताप, खोकला, डेंग्यू, बीपी, शुगर, टाचांचे आजार, गुडघेदुखी, कंबर दुखी, ऑक्सिजन लेव्हल, त्वचारोग, वजन, उंची आदी तपासणी करण्यात आली, तसेच औषधेही देण्यात आली.

या वेळी जिल्हा समन्वयक ज्योती देशमाने, अध्यक्ष शिवानी जंगम, सेक्रेटरी रामचंद्र गायकवाड, खजिनदार किशोर पाटील, प्रांतपाल अमरचंद शर्मा, एस. आर. परमेश्वरन, संजिव सुर्यवंशी, सहखजिनदार मिनिल खालापूरकर, उपाध्यक्ष भरत पाटील, उपाध्यक्ष लहु भोईर तसेच या त्रीतपपूर्ती सोहळ्याचे कमिटी, अध्यक्ष, तसेच वारकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.



# वडगाव शाळेत मतदानाची गुढी उभारून जनजागृती

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या वडगाव शाळेत मतदानाची गुढी उभारून मतदान जनजागृती कार्यक्रम मुख्याध्यापक सुभाष राठोड व शाळा व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.



गावातून स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसाठी गुढीपाडव्याचे औचित्य साधून होय, मी मतदान करणार... यांसह विविध घोषणा देत व गुढी घेऊन गावातून रॅली काढण्यात आली. सोबतच स्वाक्षरी मोहीम राबवून मतदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. मतदारांनीसुद्धा उत्स्फूर्त सहभाग नोंदवत या रॅलीत सहभाग घेत, होय मी मतदान करणार, असे आश्वासन दिले. गावभरातून गुढीचे दर्शन घेत चिमुकल्यांचे कौतुक करीत होते. निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी, नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या मार्गदर्शनाने व गटशिक्षण अधिकारी कैलास चोरामले यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्याची प्रेरणा मिळाली. जास्तीत जास्त मतदारांना याबाबत अवगत व्हावे व मतदानाची जागरूकता वाढावी म्हणून गुढीपाडव्याच्या निमित्ताने ही गुढी उभारून रॅली काढण्यात आली, असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले.

या रॅलीसाठी शिक्षक वैजनाथ जाधव, सरस्वती कवाद, स्वयंसेविका निकिता, साक्षी व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

# रोह्यात मराठी नववर्ष स्वागतयात्रा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

नरेंद्रचार्य महाराज संस्थान स्वस्वरुप संप्रदाय अंतर्गत जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड यांच्या वतीने रोहा शहरात मराठी नववर्ष स्वागतयात्रा काढण्यात आली.

रोहा-कोलाड मार्गावरील नवरत्न हॉटेल येथून या स्वागतयात्रेला सुरुवात करण्यात आली. सदस्य पारंपरिक वेषभूषा परिधान करून या स्वागतयात्रेत सहभागी झाले होते. लेझीम पथक आपली कला सादर करीत होते. कोळी बांधवांनी पारंपरिक पोषाख परिधान करून ठेका घेताना दिसत होते. महिला डोक्यावर कळस, हातात गुढी व भगवा ध्वज हाती घेत या नववर्ष स्वागतयात्रेत सहभागी झाले. या स्वागतयात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात येत होते. ही स्वागतयात्रा दमखाडी, रोहा नगर परिषद चौक, रोहा एसटी स्टँड, तीनबत्ती नाका, बाजारपेठ, राम मारुती चौक ते सी. डी. देशमुख कन्याशाळा अशी काढण्यात आली.



# जिल्हाधिकाऱ्यांकडून स्ट्राँग रूमची पाहणी

## सुरक्षेची योग्य खबरदारी घेण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी रायगड लोकसभा मतदारसंघांतर्गत महाड, दापोली आणि गुहागर विधानसभा मतदार संघातील स्ट्राँग रुमला भेट देऊन पाहणी केली, तसेच या स्ट्राँग रूमच्या सुरक्षेची योग्य खबरदारी घ्यावी, असे निर्देश दिले.

डॉ. जावळे यांनी महाड, दापोली, गुहागर, पेण या विधानसभा मतदारसंघात विविध मतदान केंद्रभेटी देऊन पाहणी केली, तसेच मतदान साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र आणि महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूमची पाहणी केली. स्टाँगरूम व्यवस्थापन, नियोजनाबाबत आढावा घेतला.



मतदान यंत्रे ठेवण्यासाठीची व्यवस्था, सीसीटिव्ही यंत्रणा, अग्निशमन व्यवस्था यांची बारकाईने चाचणी करण्यात यावी, तसेच त्याठिकाणी २४ तास आवश्यक पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करावी निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या.

या वेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी महाड डॉ. ज्ञानेश्वर बाणापुरे, माणगाव तहसीलदार विकास गारुडकर, महेश शितोळे, पोलीस निरीक्षक तडवी यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# माणगाव येथे नववर्ष स्वागतयात्रा उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

रामानंदचार्य दक्षिणपीठ नाणिजधाम स्वस्वरूप संप्रदायात दक्षिण रायगड यांच्या वतीने गुढीपाडवा व हिंदू नववर्षानिमित्त मंगळवारी (दि.९) माणगाव येथे भव्य शोभायात्रा अत्यंत उत्साहात झाली. प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमान, झाशीची राणी, छत्रपती शिवाजी महाराज, वासुदेव आदी देखाव्यांमुळे या शोभायात्रेमध्ये रंगत आली. गुढ्या, कलश, तसेच ढोल पथक, लेझीम व टाळ-मृदुंगाच्या ठेक्यावर विविध प्रकारच्या पारंपरिक वेशभूषेत शोभायात्रेत भाविक सहभागी झाले होते. शहरातील बालाजी मंदिर येथून शोभायात्रेस सुरुवात होऊन सरलादेवी मंगल कार्यालय येथे सांगता करण्यात आली. शोभायात्रेनिमित्त ठिकठिकाणी भक्तगणांनी पुष्पवृष्टी व औक्षण करून यात्रेचे स्वागत केले. सर्व भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. यात्रेचे नियोजन निरीक्षक चंद्रकांत राऊत, जिल्हाध्यक्ष पुळेकर, महिला जिल्हाध्यक्ष अंजली जगताप, प्रसिद्धी प्रमुख जितू दोशी, तालुकाध्यक्ष निकिता धाडवे आदींनी विशेष मेहनत घेतली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस/जनतेस या जाहीर नोटीसी ने कळविण्यात येत आहे की, मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील **ज्ञानेश्वर गोविंद मालुसरे** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, भोगवटदार वर्ग २ प्रकारची शेतजमीन मिळकत कु.का. कलम प्रमाणे ४३ नियंत्रित सत्ता प्रकारची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे लोणिवली, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| ज्ञानेश्वर गोविंद मालुसरे | ४८ | १ | १-१२-७०<br>पो.ख. ०-२०-००<br>**एकुण १-३२-७०** | १५.८८ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतींवर, वा मिळकतींच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदि व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/जनतेनी कृपया नोंद घ्यावी

**दिनांक :- ०८/०४/२०२४**

**सही/-**
**विजय भगत अॅन्ड असोशिएटस्**
**(अॅडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat43@gmail.com


# अलिबागमध्ये नववर्ष स्वागतयात्रेत तरुणांचा उत्साह

**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठी नववर्षाची सुरुवात ज्या चैत्रपाडव्याने होते, त्या गुढीपाडव्याचा सण मंगळवारी (दि.९) रायगडात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. घरोघरी गुढी उभारण्यात आली होती. शिवाय जिल्ह्यात ठिकठिकाणी मराठी नववर्षाच्या स्वागतार्ह स्वागतयात्रा काढण्यात आली होती.





गुढीपाडव्यानिमित्त अलिबाग शहरात आयोजित मराठी नववर्ष स्वागतयात्रेत तरुणाई आणि महिलांचा प्रचंड उत्साह पाहण्यास मिळाला. मराठमोळ्या पेहेरावातील अबाल-वृद्ध आणि त्याचबरोबर महिलांचे ढोल पथक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. सकाळी शहरातील ब्राह्मण आळीमधील श्रीराम मंदिराच्या प्रांगणात अलिबागमधील गुढीची विधीवत पूजा केल्यावर या नववर्ष स्वागतयात्रेस उत्साहात प्रारंभ झाला. सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे घोड्यावरून या शोभायात्रेत सहभागी झाले होते. त्यांच्यासमवेत श्रीमती काळे या महिला घोडेस्वारदेखील सहभागी झाल्या होत्या.

मराठमोळ्या नऊवारी साडीत बुलेटवरस्वार महिला अग्रस्थानी होत्या. विविध मंडळांसह सर्वपक्षीय राजकीय नेते या स्वागतयात्रेत सहभागी झाले होते. राममंदिर, महाविर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूतळा, शेतकरी भवन, ठिकरुळ नाका, शिवलकर नाका, बाजारपेठ मार्गे ही नववर्ष स्वागतयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यावर सांगता झाली.

यंदाचे शिवराज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष असल्याने, त्याचे औचित्य साधून चित्ररथ हे यंदाचे एक वैशिष्ट्य होते. त्याचप्रमाणे अयोध्या येथील प्रतिष्ठापीत श्रीराम मूर्तीची प्रतिकृती हे देखील आकर्षण ठरले. प्रतिवर्षी या स्वागतयात्रेत नागरिकांचा सहभाग वाढत असल्याचे नववर्ष स्वागतयात्रेचे निमंत्रक डॉ. प्रा. उदय जोशी यांनी सांगितले.

खगोलशास्त्र, कर्तृत्ववान महिला या विषयावरील आगळे चित्र तर ऐतिहासिक पेहेरावातील घोडेस्वार, घोडागाड्या, कराटेपटूंची पथके आणि तालुक्यातील ढोल-ताशा पथक यांचा सहभाग हे या नववर्ष यात्रेचे एक वैशिष्ट्य होते.

# नवी मुंबई महापालिकेचा होणार विस्तार

## आयुक्तांकडून मुख्यालयातील विविध विभागांची पाहणी

## तळमजल्यावर होणाऱ्या वैद्यकीय कक्षाबाबत सूचना

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महापालिका मुख्यालयातील विविध विभागांना भेटी देत कामकाजाची पाहणी केली.या भेटी दरम्यान वेगवेगळ्या विभागातील कामकाजाचे स्वरुप जाणून घेत सुधारणेच्या दृष्टीने मौलिक सूचना दिल्या. महापालिका मुख्यालयात तळमजल्यावर वैद्यकीय कक्ष असावा व तेथे डॉक्टर असावेत आणि एक रुग्णवाहिकाही नवी मुंबई महापालिका मुख्यालयात असावी, अशा सूचना आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिल्या.

नागरिकांसाठी पिण्याच्या शुध्द पाण्याची व्यवस्था प्रत्येक मजल्यावर करावी व तशा प्रकारचे फलक प्रदर्शित करावेत. कामकाज पेपरलेस होण्याच्या दृष्टीने प्रत्येक विभागाने गतीमान कार्यवाही करावी. जलद डिजिटलायझेशन करुन घ्यावे असे निर्देश आयुक्तांनी दीले.

कार्यालयीन स्वच्छतेकडे अधिक काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देत पुढील आठवडयात आणखी एकदा पाहणी करणार असल्याचे सूचित करत फाईलींची मांडणी, नस्ती बांधलेले गठ्ठे, कागदपत्र ठेवण्याच्या पध्दती अशा बाबींमध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश व नीटनेटकेपणाला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रत्येक कर्मचारीनिहाय त्याच्याकडील कामाचे स्वरुप (जॉब चार्ट) त्याच्याकडे लिखीत स्वरुपात असणे बंधनकारक आहे.

कर्मचाऱ्यांची कागदपत्रे व नस्ती ठेवण्याची पध्दती शासकीय नियमावलीनुसार असण्याचे निर्देश



दिले. फाईलसाठी कपाटांची संख्या वाढविण्याऐवजी जागेची उपलब्धता लक्षात घेऊन कॉम्पॅक्टर सिस्टिम कार्यान्वित करण्याच्या सूचना दिल्या. पत्रव्यवहाराच्या केंद्रीय आवक-जावक पध्दतीचे तत्परतेने डिजिटलायझेशन करावे. प्रत्येक पत्राची संगणकीय नोंद होऊन त्यावरील पुढील कार्यवाहीची ई-ऑफिस पध्दतीमध्ये नोंद व्हावी. कागदपत्रे कमी करण्याच्या दृष्टीने सभांच्या विषयपत्रिका व इतिवृत्तेही शासनाच्या पध्दतीने डिजीटल स्वरुपात करावीत. नगररचना विभागाकडील नकाशे व रेकॉर्ड यांचेही अत्याधुनिक पध्दतीने जतन व्हावे, जेणेकरुन एखादया भूखंडाची संपूर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध होईल. अशाच प्रकारे मालमत्ताकर विभागाचा रेकॉर्डही डिजिटल स्वरुपात करावा.

ऑनलाईन परवाने देण्याची पध्दती अधिक गतीमान व अचूक होण्यासाठी संगणकीय अत्याधुनिक प्रणालीचा वापर करावा. परवाने संदर्भातील हवी असलेली माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी डॅशबोर्ड बनवावा तळमजल्यावर महिलांसाठी हिरकणी कक्ष असावा, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

## विविध उपक्रमांद्वारे उरणमध्ये मतदान जनजागृती

**उरण : प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अनुषंगाने स्वीप कार्यक्रम अंतर्गत १९० - उरण विधानसभा मतदारसंघातील विंधणे ग्रामपंचायत येथील विंधणे कातकरी वाडी येथील आदिवासी क्षेत्रात मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जनार्दन कासार अतिरिक्त सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरण तहसीलदार उद्धव कदम, उरणच्या गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे, चिरनेर केंद्रप्रमुख नरेश मोकाशी, रूपेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

याशिवाय महिला मेळावा, पालक सभा, पालकांना संदेश पत्राचे वाटप असे विविध उपक्रम राबवून मतदान जनजागृती करण्यात आली. या रॅलीमध्ये रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा विंधणे येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



## दुषित पाण्यामुळे आरोग्याला धोका

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे शहरात सातत्याने होत असलेल्या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नागरिकांना दुषित स्वरूपातील पाणी मिळत असल्याने पोटदुखी जुलाब तसेच अन्य साथीचे आजाराची लागण झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

भाजपच्या माजी नगरसेविका ॲड. भारती पाटील यांनी याबाबत कोपरखैरणे इथ वॉर्ड सहाय्यक आयुक्त यांना लेखी निवेदन देऊन याबाबत तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. कोपरखैरणे येथील प्रभाग क्रमांक ४४ मधील शेकडोंच्या संख्येने असलेल्या स्थानिक नागरिकांना मागील काही दिवसांपासून पिण्याचे पाणी दुषित स्वरूपातील येत आहे. याबाबत नवी मुंबई महापालिका पाणीपुरवठा विभागातील संबंधित अधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. पाणीपुरवठा विभागाकडून दुषित पाण्याचे नमुने देखील घेण्यात आले आहेत, मात्र अद्यापही पुढील काहीही कारवाई झाली नसून दूषित पाण्याचा सामना नागरिकांना आजही करावा लागत आहे. याबाबत त्वरित कारवाई त्वरित करावी, अशी मागणी नागरिकांच्या वतीने ॲड. भारती पाटील यांनी केली आहे.

## नवीन पनवेलमध्ये भीमोत्सव; लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निमंत्रण

शिंदेशाही बाणा दुमदुमणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती, नवीन पनवेल. यांच्या विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती भीमोत्सव म्हणून १३, १४ आणि १५ एप्रिल २४ रोजी मोठ्या धूमधडाक्यात साजरा करण्यात येणार आहे. आयोजक माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी आपल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना भिमोत्सवाचे निमंत्रण दिले.



या तीन दिवसीय कार्यक्रमात शनिवारी (दि. १३) सायंकाळी ६ वाजता, नवीन पनवेल सेक्टर ९ बिनेदार कॉर्नर जवळील आम्रपाली बुद्ध विहार येथे महिला मंडळाच्या विविध स्पर्धा आयोजित केलेल्या असून, पहिल्या तीन विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष रेखा सुजित खंडिझोड या असणार आहेत.

रविवारी (दि. १४) नवीन पनवेल सेक्टर ९ बिनेदार कॉर्नर जवळील आम्रपाली बुद्ध विहार या ठिकाणी सकाळच्या सत्रात, सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण बौद्धाचार्य आयु. अशोक मिसाळ यांच्या शुभहस्ते करण्यात येईल. त्यानंतर सामुदायिक बुद्ध वंदना होऊन ११ वाजता ॲड. आनंद सोनावणे, (खोपोली शहराध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा) यांच्या धम्म प्रवचनानंतर दुपारी १२.३० वाजता स्नेहभोजनाचा कार्यक्रम होईल. या सकाळच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी हे असतील.

यानंतर सायंकाळच्या सत्रात (१४ एप्रिल) सायंकाळी ६ वाजता, नवीन पनवेल (पूर्व) सेक्टर ०२ जय अंबे माते मंदिरा शेजारी, शिवाकॉम्प्लेक्सच्या बाजूच्या सिडको क्रिडांगण, बिनेदार मैदान येथे महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक, शिंदेशाही बाणा फेम आनंद शिंदे यांचा गायनाचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्वाती बिनेदार या असतील.

सोमवारी (दि. १६) सायंकाळी ७ वाजता, नवीन पनवेल सेक्टर ९ बिनेदार कॉर्नर जवळील आम्रपाली बुद्ध विहार येथे सायंकाळी ६ वाजता, ज्येष्ठ नागरिक माता-पितांचा सन्मान समारंभ आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अमोल जाधव हे असतील, अशी माहिती भीमोत्सवाचे आयोजक माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी दिली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निमंत्रण देतेवेळी वैभव कोळी, अमोल जाधव, अक्षय मिसाळ, श्रीपाद भंडारी, कविता पवार, रेखा खंडिझोड, जितेंद्र खैरे, श्याम साळवी, नंदकुमार पिंगळे, प्रकाश सोनवळे आदी उपस्थित होते.



पुणे : भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज शहा यांची भाजप सेवा प्रकोष्ट (स्वयंसेवी संस्था संपर्क) उत्तर रायगड जिल्हा संयोजकपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना नियुक्तीपत्र सेवा प्रकोष्टचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक तथा महाराष्ट्र गोसेवा आयोग अध्यक्ष शेखर मुंदडा, सहसंयोजक हर्षल मंत्री व सहसंयोजिका डॉ. पूनम राऊत यांचा हस्ते प्रदान करण्यात आले.

## खारघर हिल्स येथे वॉकेथॉन

### जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त खारघर डॉक्टर्स असोसिएशनतर्फे आयोजित वॉकथॉन उपक्रम अतिशय यशस्वी झाला. खारघर हिल्स येथे झालेल्या या कार्यक्रमात सुमारे ६० ते ६५ डॉक्टर्सनी सहभाग नोंदवला. २.५ किमीची ही चढाई उत्साहात पार पाडली गेली. हा कार्यक्रम समाजाला आरोग्यपूर्ण राहण्याचे प्रेरणा देणारा होता.

केडीएच्या कार्यकारी समितीतर्फे विविध आरोग्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन केले गेले. सर्व डॉक्टर्सनी उत्साहात सहभाग नोंदवला व खेळामध्ये आनंद लुटला. रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुण भगत यांनी या कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून सहभाग नोंदवला. खारघर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. निखिल भाराम्बे, उपाध्यक्ष डॉ.



राजेश सकपाळ, सचिव डॉ. ज्योती जाधव व कोषाध्यक्ष डॉ. राम क्षार यांनी डॉ. आनंद (आयरन मॅन ऑफ केडीए) यांचा सत्कार केला. पदके, प्रमाणपत्रे व ट्रॉफी डॉ. अरुण भगत यांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

आरोग्यपूर्ण डॉक्टरांच्या कार्यक्रमानुसार आरोग्यपूर्ण नाश्ता देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन डॉ. अंजू धर यांनी केले. या संपूर्ण उपक्रमाचे प्रायोजक अमृतवेल हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक डॉ. सुनील जाधव होते. यापुढेही खारघरमधील डॉक्टरांसाठी अशाच नावीन्यपूर्ण आणि आरोग्यपूर्ण कार्यक्रम राबवण्यात येतील, अशी हमी खारघर डॉक्टर असोसिएशन च्या कार्यकारिणी समितीने दिली आहे.

## रसायनी पोलिसांकडून अनोळखी व्यक्ती नातेवाईकांकडे सुपूर्द

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अनोळखी व्यक्ती गेल्या चार ते पाच दिवसांपासून फिरत असल्याचे रसायनी पोलिसांना समजले. त्याचा शोध घेतल्यानंतर त्याला त्याच्या नातेवाईकांकडे सुखरूपपणे सुपूर्द करण्यात आले.

याबाबत सिद्धेश्वर कॉर्नर येथील चहाचे दुकानवाले अर्जुन बाबू चव्हाण यांनी रसायनी पोलीस ठाण्याचे गोपनीय अंमलदार राहूल बढाळे यांना कळविले होते. त्यावर पोलिसांनी अनोळखी व्यक्तीस भेटून त्याचे नाव, पत्ता विचारला असता तो साऊंद भाषा बोलत असल्याचे समजले. यावर पोलीस मित्र बाळा मुरली यांना बोलून अनोळखी व्यक्तीस विचारपूस केली. खिशात मिळालेल्या दुकानाच्या व्हिजिटिंग कार्डवर संपर्क करून अनोळखी व्यक्तीचा फोटो पाठवून खात्री केली असता त्या दुकानदाराने त्याला ओळखले व त्याच्या नातेवाईकांशी संपर्क करून दिला.



फिरस्ता व्यक्तीचे नाव विनोद शंकर असे असून तो हरवल्याबाबत केरळ राज्य येथील मन्ननचेरी पोलीस ठाणे, राज्य केरळ येथे मिसिंग दाखल आहे. त्यास त्याचे नातेवाईक (बहिणीचे पती) प्रवीण के. कृष्णन याचे ताब्यात दिले असून त्याचे रक्ताचे नातेवाईक यांना कळवण्यात आलेले आहे.

## निवडक



### पत्रकार उत्कर्ष समितीच्या नियुक्त्या

**उरण :** पत्रकार उत्कर्ष समितीच्या सदस्यांची सभा रविवारी कळंबोली येथे झाली. या वेळी पत्रकार मिलिंद खारपाटील यांची रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली तसेच अन्य नियुक्त्या झाल्या. या वेळी अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे, उपाध्यक्ष राम जाधव, सचिव डॉ. वैभव पाटील, खजिनदार डॉ. शैलेश ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र लकेश्री आदी उपस्थित होते. या वेळी समितीच्या वर्षासहल, विद्यार्थी सन्मान सोहळा, पदाधिकारी निवड, कार्डचे नूतनीकरण याबद्दल चर्चा करण्यात आली. समितीत १५०हून अधिक पत्रकार सदस्य आहेत. या वेळी पंडित धायगुडे, आत्माराम पाटील यांनाही सन्मानित करण्यात आले.



**पनवेल : स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत मनोज संसारे यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी संसारे यांना आदरांजली अर्पण केली.**

## विद्यार्थ्यांकडून मतदार जनजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघातील ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा अंतर्गत शिवनगर येथे मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

रॅलीमध्ये रायगड जिल्हा परिषद शाळा शिवनगरच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तसेच रा.जि.प.शाळा शिवनगर येथे स्वीप मतदार जनजागृती अभियान अंतर्गत घरोघर जाऊन विद्यार्थ्यांकडून पालकांना पत्र देऊन पालकांना मतदानाचे महत्व सांगून जनजागृती करण्यात आली.

या अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी माझे मत माझा अधिकार या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत शिवनगर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विजेत्या स्पर्धकांचे बक्षीस देऊन अभिनंदन करण्यात आले. यासाठी शालेय मुख्याध्यापिका रजनी विनायक गायकवाड व शालेय शिक्षक मंदार वेदक यांनी मोलाचे सहकार्य केले.



## मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत सीबीडी सेक्टर-१, सुनील गावस्कर चौक येथे गुढी उभारून हिंदू नववर्षाची सुरूवात सीबीडी वासीयांसमवेत करण्यात आली.

याचबरोबर नेरूळ (पश्चिम) व वाशी येथे गुढीपाडव्यानिमित्त ढोल ताशाच्या गजरात तसेच मराठमोळ्या पारंपारिक वेशभूषेमध्ये महिला नटून थटून शोभा यात्रेत सहभागी होत नवीन वर्षाची सुरुवात करण्यात आली. गुढीपाडवा म्हणजे नववर्ष आणि दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतिक आहे. गुढीपाडवा हा साडेतीन मुहर्तापैकी एक मानला जाणारा सण आहे. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या प्रतिपदेपासून गुढीपाडवा निमित्त आज सीबीडी येथील सकल हिंदू समाज फाउंडेशन व नेरूळ (पश्चिम) मंडळातर्फे



तसेच हिंदू नववर्ष स्वागतयात्रा समिती, वाशी या सर्वांच्या वतीने मराठमोळ्या पारंपारिक वेशभूषेतील महिला व पुरुषांनी हिंदू नवीन वर्षाची सुरुवात केली तसेच आज संपूर्ण महाराष्ट्र गुढीपाडवा सण हा मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा होत आहे. त्याचबरोबर आमदार मंदाताई म्हात्रे यांनी बेलापूर मतदारसंघातील विविध ठिकाणी शोभा यात्रेस भेट देत नागरिकांना गुढीपाडवा व नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक डॉ. जयाजी नाथ, सुरज पाटील, गिरीश म्हात्रे, माजी नगरसेविका सरोज पाटील, सुरेखा नरबागे, स्वाती गुरखे, राजू तिकोने, सुहासिनी नायडू, देवा म्हात्रे, भास्कर यमगर, हितेश गामी, विनय कोळपकर, संजय ओबेरॉय, संतोष पळसकर, सागर मटकर, क्षितिजा घोरपडे व असंख्य नागरिक तसेच तरुणवर्ग उपस्थित होता.

निवडक

### वहूर उगवतीवाडी येथे पाण्याची टाकी




**महाड** : तालुक्यातील वहुर उगवतीवाडीला पिण्याच्या पाण्याची टाकी भेट देण्यात आली आहे. बाबूशेठ जैन रोटरी क्लब आणि महाड पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने ही टाकी सोमवारी (दि.८) ग्रामस्थांकडे सुपूर्द करण्यात आली. या कामात महाडमधील दिलीप देविदास, सोमनाथ ओझर्डे, आदींनी मदत केली. बाबुशेठ जैन यांनी स्व. कंकुबाई जैन, स्व. शशिकला जैन यांच्या स्मरणार्थ पाच हजार लिटर क्षमतेची टाकी भेट देण्यात आली. या वेळी बाबुशेठ जैन, महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकणे, जनसंवादचे सचिव दिलीप मुजुमले, ग्रामपंचायत सदस्य किरीट पेंढारी आदी उपस्थित होते.

### वरवठणे येथे सुसज्ज व्यायामशाळा



**नागोठणे** : वरवठणे गावातील तरुणांची व्यायामशाळेची गरज ओळखून भाजप नेते किशोर म्हात्रे यांनी सुप्रिम पेट्रोकेम आमडोशी या कंपनीकडे व्यायामशाळेच्या साहित्याची मागणी केल्यानंतर वरिष्ठ अधिकारी आनंद वागळे यांनी कंपनीच्या सीएसआर फंडातून व्यायामशाळेच्या साहित्यासाठी सात लाख रुपये मंजूर केले. गुढीपाडवा व मराठी नवीन वर्षाचे औचित्य साधून या व्यायामशाळेचे उद्घाटन भाजप युवा नेते प्रसाद भोईर व शिवसेनेचे युवा नेते मनोज खांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजपचे माजी विभाग अध्यक्ष मोरेश्वर म्हात्रे, विहान जिमचे मालक भरत गिजे, सामाजिक कार्यकर्ते मारुती राणे, सागर शिर्के, विशाल म्हात्रे, माजी उपसरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, दत्ताराम करजेकर, नरेश म्हात्रे, संतोष म्हात्रे, सुयोग म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, मनीष म्हात्रे, शुभम म्हात्रे, सुधीर भोय, व्दारकानाथ भोय, राज पाटील, उमेश पाटील, अमीत पाटील, जय म्हात्रे, शुभम राणे आदी उपस्थित होते.

### गुढीपाडव्यानिमित्त अनोखी रांगोळी



**मुरूड** : गुढीपाडवा म्हणजे मराठी नववर्षाचे स्वागत विविधरित्या साजरे केले जात आहे. तालुक्यातील नांदगाव येथील प्रसिद्ध रांगोळीकार अनिरुद्ध खेडेकर यांनी नववर्ष साजरे करण्यासाठी नटलेली व सजलेली विशिष्ठ वेषभूषा परिधान केलेली बालिका आपल्या रांगोळीतून साकारली आहे. ही रांगोळी एवढी बोलकी व अगदी हुबेहूब साकारल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# उन्हाळी भातशेतीला अखेरची घरघर

## माणगावमध्ये पिकाचे क्षेत्र घटले; चाऱ्याचा प्रश्नही गंभीर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता, मात्र डोलवहाळ बंधाऱ्यातील कालवा ठिकठिकाणी नादुरूस्त झाला आहे. शासनाकडून या कालव्याची साफसफाई करण्यासाठी पुरेशी यंत्रसामुग्री मिळत नसल्याने माणगाव तालुक्यातील शेवटच्या शेतीपर्यंत पाणी पोहचत नसल्याने उन्हाळी रब्बी हंगामातील पिकाचे क्षेत्र कमी होऊन भातपीक धोक्यात येत आहे.

यंदाचे वर्षी तालुक्यातील शेतकऱ्यांनी १२० हेक्टर म्हणजेच ३०० एकरवर भातपिक लावणी होणार आहे. गेल्या पाच वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणात भातपिक घेतले जात होते. सध्या कालवा पाण्यामुळे एक हजार हेक्टर क्षेत्र पडून आहे. यंदा वाल ७०० हेक्टर, मूग ३५० हेक्टर, हरभरा २०० हेक्टर, मटकी १०० हेक्टर एकूण १३५० हेक्टर तर कलिंगड ५०० हेक्टर, भाजीपाला १०० हेक्टरवर लागवड केली होती. दरवर्षी १५ डिसेंबर रोजी कोकण हंगाम पिकासाठी काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगावमधील शेतीला सोडण्यात येते.

यंदाचे वर्षी हे पाणी ५ जानेवारीला सोडल्यामुळे शेतकरी नाराज होता. उन्हाळी भातपिक हे शाश्वत पिक म्हणून शेतकरी पाहतो. त्याचबरोबर गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यंदाचे वर्षी माणगाव तालुक्यात भातपिकाची लागवड १२० हेक्टर क्षेत्रावर केली यंदा भाताची क्षेत्र कमी झाले. भाताची ओळख माणगावची पुसट होत असली तरी कडधान्य आणि कलिंगडाच्या विक्रमी उत्पादनातून ती ओळख गडद होत आहे. रब्बी भाताचे क्षेत्र वाढवण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.



## नववर्षाच्या स्वागतासाठी कर्जतमध्ये स्वागतयात्रा



**कर्जत : प्रतिनिधी**

मराठी नववर्षाच्या स्वागताचा सण म्हणजे गुढीपाडव्यानिमित्त कर्जतमधील अनेक संस्थांनी एकत्र येऊन स्वागतयात्रेचे आयोजन केले होते.

कपालेश्वर देवस्थान समिती, सार्वजनिक गणेशोत्सव समिती, विश्वहिंदू परिषद, बजरंग दल, शिवतांडव प्रतिष्ठान ढोल-ताशा पथक आदींनी एकत्र येऊन स्वागतयात्रेचे आयोजन केले होते. टिळक चौकातून या स्वागतयात्रेचा शुभारंभ करण्यात आला.

या शोभायात्रेत माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे, माजी नगरसेवक सुनील गोगटे, सुरेखा शितोळे, मधुरा चंदन, साईनाथ श्रीखंडे, अभिजित मराठे, दिलीप गडकरी, आशिष गोखले, विशाल जोशी, पद्माकर गांगल, महेंद्र बोडके, विवेक भागवत, शैलेश काळे, स्नेहा गोगटे, शर्वरी कांबळे, मीना प्रभावळकर, मंगल गायकवाड, दया हजारे, चिंतामण ठाकरे, स्नेहा गाढे, मनीषा अथनीकर, ज्योती कडू, प्रज्ञा परांजपे, सायली कुंभरी, माधवी दिघे, भारती म्हसे, सायली जोशी, शर्मदा जोशी, दीपक बडगुजर, पांडुरंग गरवारे, सर्वेश गोगटे, मिलिंद खंडागळे, रामचंद्र हजारे आदींसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही स्वागतयात्रा कर्जत शहरातील मुख्य बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटील आळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे पुन्हा टिळक चौकात आली आणि श्री कपालेश्वर मंदिरात सामुदायिक आरती करून सांगता करण्यात आली. ढोल पथकांनी उपस्थितांचे मन जिंकले. विद्याविकास मंदिर व अभिनव ज्ञानमंदिर शाळेतील चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, श्रीराम, सीता, लक्ष्मण, मावळे आदींची वेशभूषा करून कर्जतकरांची मने जिंकली.

## मुरूडमध्ये बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

गुढीपाडव्यानिमित्त हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी मुरूडमध्ये भव्य बाईकरॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये भगवे वस्त्र परिधान करून, दुचाकीला भगवे झेंडे लावून कोटेश्वरी माते की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेवच्या घोषणा देत ही रॅली कोटेश्वरी मंदिरापासून ते काळभैरव मंदिरापर्यंत काढण्यात आली. पद्मदुर्ग पथकाने बाजारपेठेत ढोल-ताशा वाजवून नववर्षाचे स्वागत केले.

या वेळी कुणाल सतविडकर, रूपेश जामकर, सचिन करंदेकर, प्रमोद भायदे, सुधीर सिंग आदींसह पद्मदुर्ग ढोल-ताशा पथकांचे सदस्य व नागरिक सहभागी झाले होते.

शहरात नववर्षाचा जोश पहावयास मिळाला. प्रत्येकाने आपल्या घरासमोर गुढी उभारून नवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत केले. प्रत्येक दुकानासमोर श्रीखंड घेण्यासाठी मोठी गर्दी होती.





# महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरेंच्या प्रचाराला पोलादपुरात सुरुवात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील पितळवाडी येथे महायुतीचे रायगड लोकसभेचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचाराचा नारळ सोमवारी (दि.८) आमदार भरत गोगावले यांनी फोडला.

प्रारंभी तालुक्याचे आराध्यदैवत श्रीकाळ भैरवनाथ देवस्थानामध्ये दर्शन घेऊन खासदार सुनील तटकरे, आमदार गोगावले, सुभाष निकम, मनोज भागवत, विकास गोगावले, अपेक्षा कारेकर, चंद्रकांत कळंबे तसेच अन्य मान्यवरांनी श्रीफळ अर्पण करून महायुतीच्या देशभरातील विजयासाठी साकडे घातले आणि त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी व्यासपिठावर कोकण प्रदेश युवासेना कोअर कमिटी अध्यक्ष विकास गोगावले, प्रमोद घोसाळकर, अरुण चाळके, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस अपेक्षा कारेकर, महाड विधानसभा ज्येष्ठ नेते सुभाष निकम, महाड तालुकाध्यक्ष निलेश महाडिक, पोलादपूर तालुकाध्यक्ष विठोबा पार्टे, शिवसेना महिला संघटिका निलीमा घोसाळकर, महाड तालुक संघटिका स्वप्ना मालुसरे, सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, किशोर जाधव, शैलेश उतेकर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, भाजपचे तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, गीते यांनी स्नेहल जगतापला रेड कार्पेटवरून विधानसभेत पाठविण्याची भाषा केली. खरे तर, स्नेहल जगतापला जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी चपला झिजवायला हव्या असताना रेड कार्पेटचे स्वप्न दाखवून गीतेंनी चुकीचे मार्गदर्शन केले. पोलादपूर तालुक्यात रस्ते, पूल, सभागृहे या विकासकामांसोबतच पर्यटन विकास, धरणे, कारखानदारी तसेच वैयक्तिक विकासाच्या योजना पुढील पाच वर्षांत कार्यान्वित करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

आमदार भरत गोगावले यांनी, तालुक्यातील सुमारे ४०० कोटींच्या विकासकामांची यादी वाचून दाखविताना ही विकासकामांची यादी स्नेहल जगतापला पाठवा, असे उपहासात्मक उद्गार व्यक्त करून मतांची बेरीज पाहता खासदार तटकरे यांना देशातील टॉप टेनमधील मताधिक्य मिळविणारे खासदार होण्याची संधी रायगड लोकसभा मतदारसंघातून मिळणार आहे, असा दावा केला. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत यांनी, देशातील सर्व पक्षांच्या नेत्यांना आज भाजपमध्ये प्रवेश घ्यावासा वाटतो. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होण्यासाठी महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना संसदेत पाठविण्याची भूमिका आपण सर्व महायुतीतील घटकपक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेऊन येत्या सुनील तटकरे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन केले.

शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे यांनी, अनंत गीते यांनी साखर येथे मुठी आवळून सभेमध्ये निष्ठेच्या गप्पा केल्या. त्यांच्या सहा लोकसभा निवडणुकीतील विजयावेळी आम्ही हातभार लावूनही उमरठला एक रूपयाचा निधी दिला नाही, अशी टीका केली. कोकण प्रदेश युवा सेना कोअर कमिटीचे अध्यक्ष विकास गोगावले यांनी, खासदार तटकरे यांनी पुन्हा लोकसभेवर निवडून जाण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करू, असे स्पष्ट केले.







## पेण कन्याशाळेत स्वीप पथकाद्वारे मतदान जागृती

**पेण : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघातील १९१ पेण विधानसभा मतदारसंघांतील स्वीप पथकाने कन्याशाळा, नगर परिषद शाळा क्र. ३ येथे जाऊन मुख्याध्यापक रंजना म्हात्रे, शिक्षक यांच्यासोबत विद्यार्थ्यांना मतदानाबाबत माहिती देण्यात आली.

या वेळी विनायक पवार यांनी मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले व आपल्या आई-बाबांना मतदानाच्या दिवशी सुट्टीवर न जाता प्रथम मतदान करण्याचा आग्रह करावा, असे सांगितले, तसेच विद्यार्थ्यांना संकल्पपत्र वाटप करण्यात आले. हे संकल्प पत्र विद्यार्थ्यांनी आपले आई-वडील व इतर नातेवाईकांना वाचून दाखवून त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन करण्यात आले.



पेण निवडणूक शाखा स्वीप पथकामधील विनायक पवार, प्रवीण बैकर आणि मिलिंद महांगडे यांनी हा कार्यक्रम घेऊन मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले.


# वरंध घाट ३० मेपर्यंत वाहतुकीसाठी बंद

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे प्रवाशांना आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५वरील वरंध ते रायगड जिल्हा हद्दीत प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम, संरक्षक भिंत बांधण्याची व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे ८ एप्रिलपासून ३० मेपर्यंत वरंध घाटातील रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

राजेवाडी ते रायगड जिल्हा हद्द या रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम, संरक्षक भिंती बांधण्याची व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यासाठीची कामे प्रगतीत आहे. वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्दीमध्ये संरक्षक भिंतीचे काम प्रगतीपथावर असून बहूतांश काम पूर्ण झालेले आहे, परंतु वरंध ते रायगड जिल्हा हद्द या लांबीमध्ये लांबीमध्ये खोल दरी व उंच डोंगर असून रस्त्याची रुंदी काम करावयास अपुरी आहे. या लांबीमध्ये चालू वाहतुकीमध्ये काम करताना अपघात होण्याची दाट शक्यता आहे, तसेच पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे हा मार्ग बंद करण्यात येणार आहे.



नागरिकांनी पुण्याकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-माणगाव -निजामपूर रोड-ताम्हाणी घाट -मुळशी पिरंगुट पुणे व पोलादपूर आंबेनळी घाट, वाईमार्गे पुणे असा मार्ग वापरावा. त्याचप्रमाणे कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर -खेड -चिपळूण-पाटण -कराड -कोल्हापूर असा मार्ग वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नववर्ष शोभायात्रा






























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com